रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २५४ | पृष्ठे १० | RGD/016/2026-28 www.krushival.in

## शाळकरी मुलीवर अतिप्रसंग

**पुणे :** शाळेत सोडण्याची बतावणी करुन अल्पवयीन मुलीवर मोटारीत अतिप्रसंग करण्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी एका २९ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीचा आहे. त्याची पीडित मुलीच्या आईशी ओळख होती. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणेसातच्या सुमारास अल्पवयीन मुलीला मोटारीतून शाळेत सोडतो, असे सांगून तिला आरोपीने नेले. कर्वेनगर भागातील डीपी रस्त्यावर त्याने मोटार थांबविली. मोटारीत त्याने मुलीला धमकावून अतिप्रसंग केला.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹



रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची किंवा मुलाची आवश्यकता आहे.
ठिकाण : सासवणे
संपर्क: +91 9607102357


## वेधक

### मुरुडमध्ये घरफोडी करणारा अटकेत

**मुरूड :** मुरूड पोलिसांनी घरफोडीच्या मोठ्या गुन्ह्याचा छडा लावत तब्बल १० लाख ५० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले असून आरोपीला अटक केली आहे. फिर्यादी रामचंद्र सहादेव काते (रा. वाडुंजी) हे कुटुंबासह मुंबई येथे गेले असताना त्यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना २ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीत घडली असून फिर्यादी परत आल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात आले. याबाबत १७ फेब्रुवारी रोजी मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.घटनेचा तपास सुरू करत पोलिसांनी परिसरात शोधमोहीम राबवली. गुप्त माहितीच्या आधारे पान ५ वर

### दारूच्या नशेतून एकाची हत्या

**पनवेल :** पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपूल परिसरात दारूच्या नशेत झालेल्या भांडणातून एका व्यक्तीची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विजय (पूर्ण नाव अद्याप जाहीर नाही) या व्यक्तीचा मृतदेह उड्डाणपुलाखाली आढळून आला होता. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी आरोपीला अटक केली आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास उड्डाणपुलाखाली एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला व शवविच्छेदनासाठी पाठवला. तपासात मृताची ओळख विजय अशी पटली.

### महिलेने केली आत्महत्या

**मुंबई :** आजारपणाला कंटाळून एका वृद्ध महिलेने इमारतीच्या ३८ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी अँटॉप हिल येथे घडली. या प्रकरणी अँटॉप हिल पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.नम्रता कदम असे यातील मृत महिलेचे नाव असून त्या अँटॉप हिल येथील इस्ट बे या इमारतीमध्ये पती आणि मुलांसह राहत होत्या. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना मूत्रपिंडाचा त्रास होत असल्याने त्या मानसिक तणावात होत्या. घटनेच्या वेळी इमारतीखालीच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम सुरू होता. नम्रता यांना एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांचा मृत्यू झाला होता.

## जिल्ह्यातील महिलांच्या डोक्यावर हंडा

# 9 कोटींचा आराखडा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

जिल्ह्यात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने तब्बल ९ कोटी ३० लाख रुपयांचा संभाव्य कृती आराखडा तयार केला असला, तरी अनेक गावांमध्ये आजही महिलांच्या डोक्यावर पाण्याचे हंडे दिसत आहेत. जिल्ह्यात यंदा तीन हजार मिमीपेक्षा जास्त पाऊस होऊनही जानेवारीनंतर पाण्याची टंचाई जाणवू लागल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहिरी खोल करणे, गाळ काढणे, नवीन विंधन विहिरी घेणे तसेच नळ पाणी योजनांची विशेष दुरुस्ती अशा उपाययोजनांसाठी कोट्यवधींची तरतूद करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात अनेकगावांतील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने आराखडा मोठा पण पाणी कुठेय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यामध्ये यंदा समाधानकारक पाऊस पडला. तीन हजार मि.मी.पेक्षा अधिक पाऊस पडला. धरणे, नदी, तलाव पाण्याने तुडूंब भरले. जिल्हा परिषदेसह वेगवेगळ्या विभागामार्फत जलजीवन योजनांसह अन्य पाण्याच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र तरीदेखील पाण्याची टंचाई जानेवारीनंतर निर्माण होते. पाण्यासाठी अनेक गावांतील नागरिकांना वणवण करावी लागते. म्हणूनच पाण्याचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई संभाव्य आराखडा तयार केला आहे. ऑक्टोबर २०२५ ते जून २०२६ या कालावधीसाठी नऊ कोटी ३० लाख ५० हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. जिल्ह्यातील ४६७ गावे व ७८६ वाड्या असे एकूण एक हजार २५३ ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार आहे. त्यामध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत कृती आराखडा निरंक आहे. जानेवारी ते मार्च या कालावधीत ४ कोटी नऊ लाख पान ५ वर



### एक दिवसआड पाणी

अलिबाग तालुक्यातील उमटे येथील धरणात पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. मे महिन्यात पाण्याचा दुष्काळ निर्माण होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने उमटे धरणातून नियमीत होणाऱ्या पाणी पुरवठ्यामध्ये कपात सुरु केली आहे. मागील आठ दिवसांपासून एक दिवस आड पाणी देण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे या गावांतील सुडकोलीपासून आक्षीपर्यंतच्या १२ ग्रामपंचायतीच्या ६० हजार नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### पाणी टंचाई आराखड्यावर दृष्टीक्षेप

| योजना | एकूण गावे-वाड्या | अपेक्षीत खर्च (रुपयात) |
|---|---|---|
| टँकरने पाणी पुरवठा करणे | 774 | 3 कोटी 49 लाख |
| विहिरी खोल करणे | 174 | 1 कोटी 72 लाख |
| नवीन विंधन विहिरी बांधणे | 102 | 94 लाख 25 हजार |
| पाणी पुरवठा योजना दुरुस्ती | 100 | 2 कोटी 74 लाख |

### विशेष दुरुस्तीसाठी दोन कोटी

जिल्ह्यात ठिकठिकाणी नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र अनेक योजना होऊनही पाणी नाही, पाईप नादुरुस्त आहेत. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी यावर्षी पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती करण्यासाठी दोन कोटी ७४ लाख ८४ हजार रुपयांचा अपेक्षीत खर्च आहे. त्यामध्ये ८५ गावे व १५ वाड्या अशा एकूण शंभर ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार आहे.

## दहावीचे विद्यार्थी वाहतूक कोंडीत




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

दहावीच्या परीक्षेसाठी निघालेले विद्यार्थी शुक्रवारी कुरुळजवळ वाहतूक कोंडीत अडकले. अर्धा ते पाऊण तास त्यांना रस्त्यातच ताटकळत राहवे लागले. या रस्त्यावर सुरु असलेल्या कामाचा फटका दहावीच्या विद्यार्थ्यांना बसला. कुरूळ - बेलकडे रस्त्यावर असलेल्या वाहतूक कोंडीत हे विद्यार्थी अडकले. तीन वाहतूक पोलिसांच्या भरोवश्यावर वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविला जात आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यावर कामाचा ताण पडत आहे. दहापेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची नेमणूक यापरिसरात पान ५ वर


**तुम्ही आजारांना कंटाळले आहात का?**
**उपाय काहीच मिळत नाही का?**
डायबेटीस, बी.पी., दमा, कोलेस्ट्रॉल, संधीवात, किडनीस्टोन असे अनेक शारीरिक व्याधींना सामना करत आहात का?
या सर्व आजारांपासून मुक्त होऊन एक निरोगी जीवन देण्यासाठी आणि शरीर स्वास्थ्य देण्यासाठी दिनांक २२-२-२०२६ रविवारी ठीक ११ वाजता सकाळी एक महान आयुर्वेदाचार्य डॉ.संदीप यादव यांचे उपचार आणि आयुर्वेदाची साथ यासाठी एक व्याख्यान आयोजित केले आहे. डॉ. संदीप यादव हे जुन्यातला जुना आजार कसा बरा करावा आणि शरीर स्वस्थ कसे ठेवावे हे नियोजन आणि आयुर्वेद ज्ञान देणार आहेत.
ठिकाण :- कित्ते भंडारी हॉल (भवन)
अलिबाग-रेवदंडा रोड, चेंढरे-श्रीबाग जवळ
Dr. jayesh - 9664189420
Dr. Swamini- 7507307563


## माथेरानमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह घोटाळा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेमध्ये तीन वर्षे सदस्य मंडळ अस्तित्वात नव्हते. त्या कालावधीत मुख्याधिकारी हेच प्रशासक असल्याने प्रशासक यांच्याकडून नगरपरिषदेचा गाडा चालविला जात होता. या कालावधीत जनहिताचे कोणतेही निर्णय पालिकेने घेतले नाहीत, धोरणात्मकनिर्णयघेण्यासाठीपालिका प्रशासक यांना जिल्हाधिकारी यांची परवानगी आवश्यक असते. दरम्यान, अशा परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत किंवा नाहीत याची माहिती गुलदस्त्यात असून सार्वजनिक शौचालय यांच्या नावाखाली सव्वा तीन कोटींचा चुराडा पालिकेने प्रशासक काळात केलेला आहे.

याबद्दल पालिकेच्या सर्वसाधारण सभेत जोरदार चर्चा झाली आणि त्यात खरेदी निर्णय घेणारे प्रशासक म्हणून जबाबदारी असलेले मुख्याधिकारी पान ५ वर



- **सर्वसाधारण सभेत मुख्याधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती**
- **प्रशासकीय काळात सव्वातीन कोटींच्या चुराड्याचा आरोप**

### १६ ई- टॉयलेट

स्वच्छतागृहांची खरेदी बाजारभावापेक्षा चढ्या भावाने करण्यात आली आहे. आता माथेरानमध्ये आठ ई- टॉयलेट पोहोचली असून त्यावर सव्वा तीन कोटींचा खर्च झाला आहे. शासनाने अन्य आठ ई-टॉयलेटची खरेदी प्रक्रिया रद्द करावी आणि माथेरान पालिकेला आर्थिक कोंडीतून वाचवावे, अशी मागणी केली आहे.

## एकल मातेचे नाव, जात लावण्यास परवानगी

- **उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

एकल मातेने वाढवलेल्या पाल्याला केवळ गरज म्हणून वडिलांचे नाव, आडनाव आणि जात लावण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. एकट्या आईला पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे, हा तिचा संविधानिक अधिकार आहे. वडिलांच्या अनुपस्थितीत पाल्याचे संगोपन करणाऱ्या आईला दुय्यम स्थान देण्याचा आग्रह तथाकथित विकसित समाज करू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण पान ५ वर

## गंभीर आजारांवर आता घरपोच उपशामक काळजी सेवा

**कर्करोग, हृदयरोग व वृद्धापकाळाच्या आजारांमध्ये**

**| रायगड | प्रतिनिधी |**

सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यात वाढत्या कर्करोग, हृदयरोग व वृद्धापकाळाशी संबंधित आजारांच्या पार्श्वभूमीवर राज्य पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रम अधिक सक्षम करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. आता उपशामक सेवा केवळ रुग्णालयापुरती मर्यादित न राहता आरोग्यवर्धिनी केंद्रांमार्फत गावागावात आणि रुग्णांच्या घरी जाऊन पुरवली जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील जनतेला दिलासा मिळणार आहे.

पॅलिएटिव्ह केअर म्हणजे केवळ आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यातील सेवा असा गैरसमज असला तरी, नव्या निर्णयानुसार आजाराचे निदान झाल्यापासून उपचारांच्या संपूर्ण कालावधीत रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक आधार दिला जाणार आहे. यामागील मुख्य उद्देश रुग्णाचे जीवन सुसह्य करणे आणि वेदना कमी करणे हा आहे.

कार्यक्रमांतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, सेविका आणि आशा स्वयंसेविका यांच्या माध्यमातून रुग्णांचे सर्वेक्षण करून त्यांच्या गरजेनुसार आठवड्यातून किंवा महिन्यातून गृहभेट दिली जाणार आहे. त्यांच्याशी संपर्क साधून याचा लाभ घेता येईल. तीव्र वेदना कमी करण्यासाठी मॉर्फिनसारखी औषधे प्राथमिक आरोग्य पान ५ वर

## राहुल गांधी यांना जिवे मारण्याची धमकी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भाजप आणि करणी सेनेच्या एका कार्यकर्त्याने एका व्हिडिओद्वारे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना शिवीगाळ करणाऱ्या काँग्रेसच्या २५ खासदारांची गोळ्या घालून हत्या करण्याची धमकी दिली. या धमकीसाठी संसदीय कामकाजमंत्री किरण रिजीजू यांना जबाबदार ठरवून काँग्रेसच्या नेत्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. भारताच्या सुरक्षेसाठी राहुल गांधी सर्वांत धोकादायक व्यक्ती असल्याचे विधान करून रिजीजू यांनी जनभावना भडकवल्या आहेत. हा सुनियोजित आणि कपटपूर्ण कटाचा भाग असून रा. स्व. संघ-भाजप म्हणजे एक गोडसे फॅक्टरी असल्याचा आरोप पवन खेडा यांनी केला.

**अलिबागमध्ये कार्यक्रमाचे आयोजन | ऐतिहासिक भूमीत शिवचरित्राचे सजीव सादरीकरण**

## प्रतापगड पर्वाने जागविला इतिहास

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग येथे प्रतापगड पर्व कार्यक्रमातून शिवचरित्राचे सजीव सादरीकरण फाल्गुन वैद्य तृतीया, शके १५५१ अर्थात १९ फेब्रुवारी १६३० हा स्वराज्याच्या उषःकालाचा दिवस छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मदिन. दख्खनवरील परकीय आक्रमणांची साखळी तोडून लोककल्याणकारी स्वराज्य उभारणारे शिवछत्रपती हे जिजाबाई यांच्या संस्कारांत घडलेले अद्वितीय व्यक्तिमत्त्व मानले जाते. या प्रेरणादायी वारशाचे स्मरण ठेवत अलिबागमध्ये भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




● (उर्वरीत छायाचित्रे पान १० वर)

अलिबाग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गाज फाउंडेशन आणि मनस्विनी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतापगड पर्व हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात शिवरायांच्या जीवनातील निवडक स्फूर्तीदायक प्रसंगांचे नाट्य-संगीताच्या माध्यमातून प्रभावी सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमास अलिबागकरांसह शिवप्रेमींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या माध्यमातून शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, लोकाभिमुख राज्यकारभार आणि स्वराज्याची संकल्पना यांचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले. आयोजकांनी उपस्थितांना शिवविचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक रघुजीराजे आंग्रे आणि ॲड. मानसी संतोष म्हात्रे होते. मावळा प्रतिष्ठानचे आकाश राणे, यतिराज पाटील, सिद्धार्थ नाईक, शुभम नखाते व सहकाऱ्यांनीदेखील सहकार्य केले.कार्यक्रमास नगराध्यक्षा अक्षया नाईक, शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, पान ५ वर



अर्जदारतर्फे वकील
रंभजिता परशुराम म्हात्रे
नि.नं.

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात,
दिवाणी चौकशी अर्ज नं. २६/२०२६.

१. श्रीमती. लीना हेमंत खडके,
वय - ६२ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. अ/७ धनंजय, को. ऑप. सोसायटी,
सुरुची हॉटेल जवळ, पिंपळभाट,
ता. अलिबाग, जि. रायगड.
२. सौ. हेमाली विनय पाटील,
वय - ३५ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. फ्लॅट नं. ६०३, मैथिली, रवि कंपाऊंड रोड,
सब वे जवळ, पाचपाखाडी, नौपाडा, ठाणे. अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात, कै. हेमंत प्रल्हाद खडके यांस अर्जदार नं. १ व २ हेच कायदेशीर वारस आहेत, असे प्रमाणित करणेत यावे व तसा वारस दाखला अर्जदारांचे लाभांत मिळणेकरीता, या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन VIII ऑफ १८२७ चे कलम २ अन्वये सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी अर्जदारांचे लाभांत वारस दाखला देणेस त्यांचेव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास व कोणाचीही हरकत असल्यास, संबंधितांनी नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक २४-३-२०२६ रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११:०० वा. स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात त्यांच्या हरकती दाखल कराव्यात. अशाप्रकारे कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास अर्जदारांचे लाभात तसा योग्य तो वारस दाखला देणेत येईल व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा. न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.
अलिबाग,
तारीख :-

क. लिपीक — दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अलिबाग- रायगड
अधिक्षक — दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अलिबाग- रायगड

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा मोठे भाल हद्दीतील मौजे कान्होबा, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. अनिकेत दिनमित्र म्हात्रे व श्री. तुषार दिनमित्र म्हात्रे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कान्होबा | १२२ अ | ०.२३.७० पो.ख. ०.०१.३० ०.२५.०० | ३.२५ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकवीस) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही /-
ठिकाण : पेण
दि. २१/०२/२०२६
**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| ओम प्रकाश आर्य मानसी कुमारी | १८० | १७३ | २५०.०० | २५ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- २०/०२/२०२६
मो. नं. ९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे बहिरोळे, ता.अलिबाग,जि. रायगड येथील श्री. मंदार विनायक वझे वगैरे, रा. बहिरोळे यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
मौजे बहिरोळे, ता. अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २४२, क्षेत्र ०-२९-४० हे. आर + पो.ख. ०-०९-६० हे. आर, एकूण क्षेत्र ०-३९-०० हे. आर, आकार रु. ०.५४ पैसे. पैकी श्री. मंदार विनायक वझे वगैरे यांचा अविभक्त हिस्सा व त्यावरील ग्रुप ग्रामपंचायत मापगांव मालमत्ता क्रमांक २२३, क्षेत्र ५६० चौ.फुट.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग सही/-
दिनांक :- २१/०२/२०२६
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मार्गाची वाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सईद शाह मोहम्मद खान यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| २६ | ७ | ०-६६-० | ०-६५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०२/२०२६
**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस - कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे फुफादेवीपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील, राहणार फुफादेवीपाडा यांचा रे.मु. क्र. ६२/१९९१ मधील हुकूमनाम्याद्वारे/निकालाद्वारे ४/९ इतका हिस्सा असल्याचे मा. न्यायालयाने जाहीर केले असून, त्याबाबतचा अंमल संदर्भित मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी फेरफार क्र. १५४ कडे देण्यात आला आहे. श्री.आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ हिश्श्याची खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये जमिन मिळकत त्यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला जमिन खरेदीदारांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| फुफादेवी पाडा, ता.अलिबाग. | १२/३ | १-०७-०० 0-१८-०० पो.ख. १-२५-०० एकूण | १-४४ |
| सदर वरकस जमिन मिळकतीमधील श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ इतक्या अविभक्त हिश्श्याची म्हणजेच सुमारे ०-५५-५५ आर्स वरकस जमिन मिळकत, | | | |
| जमिन मिळकत. | | | |
| फुफादेवी पाडा, ता.अलिबाग. | २३/२ | ०-११-०० ०-०२-२० पो.ख. ०-१३-२० एकूण | ०-४७ |
| सदर जमिन मिळकतीमधिल श्री.आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ इतक्या अविभक्त हिश्श्याची जमिन मिळकत. | | | |

अलिबाग, सही/
दिनांक : २०/०२/२०२६.
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील


**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY**

Teaching and Non Teaching Staff Required

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), Vavoshi and Khalapur.

**Requirement :** Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections and Clerks.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Drawing, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Qualification for non Teaching :** Post Graduates or Graduates with excel and accounting experience of minimum 2 years

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**
Teachers: Upto 30,000 per month,
Clerks : Upto 25,000 Per month.
(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**
Rajashree Patil – 9892150116
Email: pnp.rajashree@gmail.com
Ankit Bhanushali – 9823897088
Email: ankitbhanushali02@gmail.com

**Interview Date :-** 6th March 2026
Timing :- 12 p.m. to 4 p.m
Venue :- PNP Education Society's Central office, Opposite Durg Suruchi Vada, Veshvi, Alibag, 402201


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे परहूरपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विलास महादेव नाईक, रा. परहूरपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| परहूरपाडा ता. अलिबाग | ३१६/१ | ०-४१-३० पो.ख. ०-०४-६० एकूण ०-४५-९० | ९.४८ |

सबब सदरहू भातशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०२/२०२६ सही/-
**ॲड. नेहा विलास तांबट**
जिल्हा न्यायालय,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राहुल वसंत म्हात्रे, रा. ६७-२, विठ्ठल मंदिर जवळ, ओवे गाव, खारघर, रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन विकसन कराराने विकसित करण्यासाठी घेण्याचे ठरविलेले आहे.
**मिळकतीचे वर्णन : मौजे दहिवली तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड, येथील बिनशेती मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०/५ | ५.१५.०० | ५१.५० | श्रीमती इंदिरा रघुनाथ लाड. |
| १०/६ | १.८०.०० | १८.०० | श्रीमती इंदिरा रघुनाथ लाड |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीच्या विकसन कराराचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही / -
दिनांक :- २०/०२/२०२६.
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अंजली मोदी, २) आदिती मोदी व ३) आरती प्रताप पंडित रा. मुंबई यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ६३६ | ०-२६-१० पो. ख. ०-०१-३० ०-२७-४० | २.०६ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही /-
तारीख : २१/२/२०२६
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहिर नोटीसीस प्रत्युत्तर

१) सर्व लोकास या नोटीसीने कळविण्यात येते आहे ते खालील वर्णनाची मिळकत या नोटीसचा मुख्य विषय आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १. | २६४ | ०-४६-५० | ९.७९ |

२) वरील वर्णनाचे मिळकती संदर्भात शारदा विनायक काठे व इतर यांचे तर्फे ॲड. आर. एम. कुंटे यांचेमार्फत जाहिर नोटीस दिनांक ११.२.२०२६ रोजीच्या दैनिक कृषीवलमध्ये प्रसिद्ध करण्यांत आली होती. तिला माझे अशील प्रमोद चिंतामण राऊत, रा. कामथ किहिम, ता. अलिबाग यांची सक्तकायदेशीर हरकत आहे. वरील मिळकत गट नंबर २६४ च्या पुर्वेला आणि उत्तर दिशेला आमचे अशिलांची खालील वर्णनाच्या मिळकती आहेत व ह्या मिळकती आमचे अशिलांच्या ताबे, कबजा, वहिवाटीत आहेत. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन (प्रमोद चिंतामण राऊत यांच्या मिळकती)**

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १. | २६६ | ०-०२-३० पो.ख. ०-००-२० | ०.४४ |
| २ | ६५ | ०-०३-८० पो.ख. ०-००-५० | ०.७५ |

३) आमचे अशीलांनी वरील वर्णनाच्या मिळकती ह्या खरेदीखत अलब २३५/२०२४ गट नं. २६५ व अलब २८०९/२०२३ गट नं. २६६ अन्वये खरेदी केलेल्या असून व त्यामध्ये घर क्र. २४३४ हे आहे आणि हे घर क्रमांक २४३४ मौजे ग्रुपग्रामपंचायत किहिम दप्तरी नोंदलेले आहे. आमचे अशीलांना वरील घर मिळकतीमध्ये आणि त्याचे शेती मिळकतीमध्ये जाणे-येणेस गट क्र. २६४ चे सरहद्दीवरुन अथवा सरहद्दीला लागून जाणे-येणेचा रस्त्याचा कायदेशीर वहिवाटीचा हक्क आहे. अशीलांनी यांच रस्त्यावरुन (कामथ ते किहिम) वरील घर मिळकत क्रमांक २४३४ चे बांधकाम करताना टेंम्पो, डंपर, ट्रक इ. वाहनामध्ये बांधकाम साहित्य नेऊन बांधकाम केलेले होते याची संपूर्ण माहिती गट नं. २६४ चे ७/१२ दप्तरी असलेले मालकांना १) सुमन सुर्यकांत राऊत, २) भक्ती चारुदत्त चोगले, ३) मयुरेश सुबोध काठे, ४) संदेश केसरीनाथ राऊत, ५) विद्या सुरेश पाठारे, ६) विश्वजित विनायक काठे, ७) शारदा विनायक काठे, ८) शुभांगी नितीन म्हात्रे, ९) संतोष केसरीनाथ राऊत, १०) कला सुभाष चोडणकर, ११) ज्योती विलास पाठारे, १२) संध्या अशोक म्हात्रे, १३) नीला संदेश राऊत, १४) पुष्पलता कृष्णकांत काठे, १५) अमित कृष्णकांत काठे, १६) मिनल कृष्णकांत काठे, १७) मंगेश रुस्तम नाईक, १८) मंजूषा रमेश बांदे, १९) अनुराधा शांताराम काठे, २०) निवेदिता शांताराम काठे, २१) यशोदिता शांताराम काठे, यांना माहिती आहे. त्यामुळे आमचे अशीलांचा कायदेशीर रस्ता वहिवाटीचा हक्क गट नं. २६४ मधून आहे याची देखील त्यांना माहिती आहे. तरी सदर मिळकती संदर्भात शारदा विनायक काठे व इतर हे आमचे अशील प्रमोद चिंतामण राऊत यांचा गट नं. २६४ मधील मौजे कामथ ते किहिम रस्त्यांवर जाणे येणेचा कायदेशीर वहिवाटीचा हक्क डावलून माझे अशीलांचे अपरोक्ष परस्पर खरेदी विक्री व्यवहार करीत आहेत ही बाब ते बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदरची जाहिर नोटीस दि. ११.२.२०२६ कृषीवलला हरकत देणे भाग पडत आहे. आमचे अशीलांना वरील गट क्रमांक २६४ मधून शेतकरी म्हणून जाणे-येणेचा कायदेशीर वहिवाटीचा हक्क व हितसंबंध असताना वरील शेतजमीन मालक जो व्यवहार करित आहेत तो व्यवहार आमचे अशीलांचे वरील गट नं. २६४ मधील रस्ता वहिवाटीच्या हक्कांवर बंधनकारक नाही व अशा व्यवहारामुळे आमचे अशीलांचे वहिवाटीवर, हक्कांवर गदा येणार आहे. त्यामुळे आमचे अशील हे सक्षम न्यायालयांत दाद मागणार आहेत याची नोंद घ्यावी. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांची कायदेशीर रस्ता वहिवाट, हक्क व हितसंबंध गट नं. २६४ मध्ये आहे. त्यामुळे सदर मिळकती संदर्भात कोणीही व्यक्तीने खरेदी-विक्री स्वरुपाचा व्यवहार करु नये तो आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही व ते खरेदीदार प्रामाणिक खरेदीदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.
४) आमचे अशील प्रमोद चिंतामण राऊत आणि त्यांचे पुर्वगामी मालक प्रकाश शंकर काठे हे मागील अंदाजे ४० वर्षापासून सदर रस्त्याचा वापर त्यांच्या मिळकतीमध्ये (गट नं. २६५ व २६६) जाणे-येणेसाठी आणि शेतीसाठी करीत आहेत. त्यामुळे दिनांक ११.२.२०२६ रोजीच्या शारदा विनायक काठे व इतर यांचेमार्फत ॲड. आर. एम. कुंटे वकिल यांचेमार्फत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या दैनिक कृषीवल मधील जाहिर नोटीसला सक्त हरकत आहे.
५) आमचे अशीलांचे वरील गट नं. २६४ मध्ये असलेले कायदेशीर रस्ता वहिवाटीचे हक्क व हितसंबंध याची तमाम जनतेला माहिती व्हावी व जनतेची फसगत होऊ नये याकरिता वरील ही नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे.
ठिकाण : अलिबाग
दिनांक : २०.२.२०२६

सही/-
**ॲड. अजय उपाध्ये**
श्रीनिल सोसायटी, तळमजला
श्री गणपतीचे देवळाजवळ,
ब्राह्मण आळी, अलिबाग रायगड.
९८५०५७०९७७

## जाहीर नोटीस

नि.८/ड
अलिबाग येथील मा. जिल्हा न्यायाधिश - २ रायगड यांचे न्यायालयांत.
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०१/२०२५.
ने.ता.२५/२/२०२६
श्रीमती स्नेहा आशुतोष करमाकर, वगैरे. ...अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही, ... सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मौजे मुनवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद वर्णनाची शेतजमीन मिळकत अर्जदार यांच्या कुटूंबाच्या सामाईक मालकी हक्कात व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत आहेत. अर्जदाराचे पती कै. आशुतोष प्रकाश करमाकर हे होते, त्यांचे दिनांक २७/०४/२०१६ रोजी निधन झाले असून, त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांस स्नेहा आशुतोष करमाकर (पत्नी), अर्णव आशुतोष करमाकर (मुलगा) व अनुराग आशुतोष करमाकर (मुलगा) अ.पा.क. आई स्नेहा आशुतोष करमाकर हे कायदेशीर वारस आहेत. अर्णव व अनुराग ही अर्जदारांस दोन जुळीची मुले आहेत. अर्णव व अनुराग यांचे वय १३ वर्षे असून, ते अज्ञान आहेत. सद्यस्थितीतील अर्जदारच्या तातडीच्या कौटुंबिक अर्थिक अडचणीस्तव, कौटुंबिक हितास्तव व कुमार अर्णव व अनुराग यांच्या शैक्षणिक खर्चासाठी संदर्भित मिळकती विकावयाचे ठरविले आहे. परंतु कु. अर्णव व अनुराग हे अज्ञान असल्याने संदर्भित मिळकतींचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याच्या प्रक्रिये दरम्यान दुय्यम निबंधक, अलिबाग यांनी मा. न्यायालयाची विक्री पूर्व परवानगीची मागणी केल्याने, सदरचा अर्ज मा. न्यायालयांत दाखल करण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| मुनवली, ता. अलिबाग. | ३७/१ | १-१६-०० ०-१३-९० पो.ख. १-२९-९० एकूण | ११-०२ |
| सदरील शेजमिन मिळकतीपैकी अर्जदार यांच्या मालकीची ०-२५-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत. | | | |

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दिनांक २५/२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मा. न्यायालयापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मा. न्यायालय अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदारास चि. कु. अर्णव आशुतोष करमाकर व अनुराग आशुतोष करमाकर यांचे अज्ञान पालनकर्ती म्हणून संदर्भित मिळकतीची विक्री पूर्व परवानगी देण्याबाबतचे आदेश देईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग - रायगड
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा अधिक्षक, जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग-रायगड

जा.क्र.३४३/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड जिल्हा अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि.रायगड
चौकशीची जाहीर नोटीस
दि. १७-०२-२०२६
अर्ज क्रमांक : ४९/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- श्री विश्वकर्मा सुतार समाज ट्रस्ट, महाड
श्री. अवतार मारुती सुतार ... अर्जदार
मु. १३८ बी, नवे नगर, सुतार आळी,
पो.महाड, ता.महाड, जि.रायगड

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग, अलिबाग हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली नमुद केलेली स्थावर/जंगम मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**(अ) जंगम मिळकत वर्णन**

| अ.क्र. | तपशील | नग | अंदाजे किंमत (रु) |
|---|---|---|---|
| १ | समई | १ | ५००/- |
| २ | मोठी घंटा | २ | १४००/- |
| ३. | छोटी घंटा | १ | १००/- |
| ४ | ताम्हण | १ | २००/- |
| ५ | गडू | १ | ५०/- |
| ६ | पंचपळी | १ | १५००/- |
| ७ | लोखंडी कपाट | १ | ८०००/- |
| ८ | पेटारा | १ | ४००/- |
| ९ | दान पेटी | १ | ८००/- |
| १०. | टेबल छोटा | १ | १०००/- |
| ११ | बैठक लाकडी बाकडे | १ | १०००/- |
| १२ | सतरंजी | २ | १०००/- |
| १३ | पंखा | १ | १२००/- |
| १४ | घड्याळ | १ | १०००/- |
| | | एकुण | १७२००/- |

(ब) खाली नमुद केलेली स्थावर मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
स्थावर मिळकत : (वर्णन )
२) मौजे महाड, पो. महाड, ता. महाड जि. रायगड येथील नगरपरिषद महाड यांच्या दस्तावरी असेसमेंट उतारा (नमुना क्र. ४३ (नियम ७३)) वर नोंद असलेली मिळकत
मालमत्ता क्र. MAHA00001257
जुना मालमत्ता क्र. W2Z3000289
मंजुळकृत मालमत्ता क्र. 179
मालमत्तेचा पत्ता क्र. १७९, सुतार आळी, नवेनगर महाड, ४०२३०१
आर. सी. सी. बांधकाम असलेले श्री विश्वकर्मा सुतार समाज, महाड,
क्षेत्रफळ : (२९.१४ चौ. मी.)
२) महाराष्ट्र शासन, मालमत्ता पत्रक महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर, व शहर भूमापन) नियम, १९६९ यातील नियम ७ नमुना 'ड',
गाव, पेठ महाड, तालुका/न.भू.का.
उप अधीक्षक भूमी अभिलेख, महाड यांचे दप्तरी नोंद असलेली मिळकत
दि. : ०८/११/१९९३,
व्यवहार विना मोबदला बक्षीसपत्र
रु.९०००/- ने चंद्रभागा, वसंत, सुंदर, रमेश, विमल व न.भू.अ.
आदेश क्र. न. भू. महाड/क.कि. ७४/९३ दि ०६/११/१९९३ अन्वये नोंद.
खंड क्र. : SR५८/१९/१०/९२,
नवीन धारक : श्री विश्वकर्मा सुतार समाज, महाड.
सादांकन : ०८/११/१९९३, न.भू.अ. (रा) अलिबाग
३) दुय्यम निबंधक महाड यांचे कार्यालयात दि. १९/१०/१९९२ रोजी दस्त नं. ५८/१९९२ ने नोंदविलेले कसबे महाड, ता. महाड महाड नगरपरिषद हद्दीतील नवे नगर, सुतार आळी येथील परडी नं ११२, हिस्सा नं.८ क्षेत्र ०-००-५ हे.आर. या मिळकतीचे विना मोबदला बक्षीसपत्र
चतुर्सिमा :

| | | |
|---|---|---|
| १ | पुर्वेस | श्री. सुनील भाघोजी सुतार यांची इमारत |
| २ | पश्चिमेस | श्री. मनोज कृष्णा इनामदार यांचे घर |
| ३ | दक्षिणेस | श्री. बाळाराम पांचाळ यांची इमारत |
| ४ | उत्तरेस | नगरपरिषदेचा अंतर्गत रस्ता |

सदरच्या नोंदणी प्रकरणामध्ये हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी दिली.

**सही/-**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड-अलिबाग**

# शेतकरी, कष्टकरी, कामगारांचे कैवारी

प्रमोद जाधव
| अलिबाग |

स्व. नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. खोती विरोधात मोठे पाऊल उचलून सर्वसामान्य शेतकऱ्यांना जगण्याचे बळ दिले. तोच सामाजिक वारसा जपत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांनी शेतकरी, कष्टकरी, कामगार, कलाकार, साहित्यिकांसाठी जिल्ह्यात काम केले आहे. त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याने संपूर्ण जिल्ह्यात एक वेगळा आशावाद निर्माण केला. कोणतेही काम हाती घेतल्यावर ते पुर्ण केल्याशिवाय न राहणारे प्रभाकर पाटील अर्थात भाऊ हे होते. 'सेवेसी ठायी तत्पर पाटील प्रभाकर' हे ब्रिद वाक्य जिल्हा परिषदेच्या भिंतीवर दिमाखात डोलत आहे. आजही त्यांच्या कार्याची महती अलिबागसह जिल्ह्यातील गावे, वाड्यांतील घराघरात सांगितली जाते. भाऊंचे निधन २१ फेब्रुवारी २००० मध्ये झाले. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.



शिक्षकांची पिढी घडविणारे स्व. नारायण नागू पाटील यांच्या क्रांतीकारी विचारांचा वारसा घेत स्व. प्रभाकर पाटील यांनी अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात समाजकार्याचा करण्यावर भर दिला. गोरगरीबांचे कैवारी बनून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी लढावू नेते म्हणून त्यांनी एक स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

समाजकारणासह राजकारण, पत्रकारिता, सांस्कृतिक, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात उंच भरारी घेतली. शेतकरी, कष्टकरी, कामगारांसह बहूजन वर्गासाठी विशेष तळमळ असणारे स्व. प्रभाकर पाटील सर्वसामान्यांचे आधारस्तंभ होते. हजरजबाबी असणारे भाऊ यांना वाचनाचीदेखील फार आवड होती. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी संपुर्ण जिल्ह्यात एक वेगळी छाप टाकली होती. सर्वसामान्यांसाठी लढणारे ते एक नेते होते. परंपरेने लाभलेला समाजकार्याचा वारसा या विविध पैलूंनी चमकणारे स्व. प्रभाकर पाटील यांचा २३ जानेवारी १९२८ रोजी जन्म झाला. आपल्या वडीलांकडून मिळालेला समाजसेवेचा वारसा जपत त्यांनी शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्गाचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. जिल्हा परिषद अध्यक्षासह जिल्हा परिषद बांधकाम सभापती म्हणून त्यांनी अनेक वर्ष धुरा सांभाळली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयासह विविध शासकीय विभाग अलिबाग व पेणमध्ये होती. हे सर्व विभाग एका छताखाली आणीन असा शब्द एका कार्यक्रमात त्यांनी त्यावेळी दिला होता. अवघ्या ६ महिन्यांत दिलेला शब्द त्यांनी पुर्ण केला. जिल्हा परिषदेचे सर्व विभाग एका छताखाली राहवे यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. अलिबागमध्ये भव्यदिव्य अशी जिल्हा परिषदेची इमारत त्यांनी उभारली. या इमारतीमध्ये सर्व विभाग एकत्र आले. त्याचा फायदा कामानिमित्त येणाऱ्या गावे, वाड्यांमधील नागरिकांना झाला. पुर्वी रायगड जिल्ह्याचे नाव कुलाबा असे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्पर्शाने झालेल्या महाड येथील रायगडच्या भूमीच्या नावाने जिल्ह्याचे नाव रायगड बनविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे कुलाबा ऐवजी रायगड या नावाने जिल्हा ओळखला जाऊ लागला.

राजकारण, समाजकार्यात भरारी घेणाऱ्या भाऊंना क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राबद्दलही प्रचंड आवड होती. गावागावात सांस्कृतिक कार्यक्रमांसह क्रीडा स्पर्धा झाल्या पाहिजे ही त्यांची भावना होती. त्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. एखाद्याने चांगले काम केल्यावर त्याच्या पाठीवर कौतूकाची थाप टाकणारे भाऊ, एखाद्याने चुक केल्यावरही स्पष्टपणे बोलणारे होते. त्यांचा एक वेगळा दबदबा प्रशासनासह राजकारण व सामाजिक क्षेत्रात होता.

सर्वसामान्य गरिबांना, पददलितांना अन्यायाच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्यांनी कृषीवलच्या माध्यमातून वैचारिक मंथन घडवून आणले. प्रभाकर पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे. वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालये आणि संस्थांचा प्रभाकर पाटील यांनी विस्तार केला. खेड्यातील आणि तळागाळातील विद्यार्थी शिकला पाहिजे हे प्रभाकर पाटील यांचे स्वप्न होते. आज हे स्वप्न त्यांचे सुपुत्र शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी पुर्ण केले. पीएनपी सारखी संस्था उभी करून गरीब व आर्थिक दृष्ट्या मुलांसाठी शिक्षणाचे दारे उघडून दिली. स्व. प्रभाकर पाटील यांची नात सून चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून या शिक्षण संस्थेचा कारभार चालविला जात आहे. नवीन पिढी घडविणाऱ्या शिक्षकांविषयी त्यांना विशेष आदर होता. शिक्षण हे एक पवित्र व्रत आहे. हा बाणा त्यांच्या अंगी असल्याने काही चुका करणाऱ्या शिक्षकांचा ते चांगलाच समाचार घेत असत. त्यामुळेच शिक्षणाच्या बाबतीत क्रांती घडवणारे ते एक शिक्षणमहर्षी बोलणे वावगे ठरणार नाही.

शासकीय योजना घराघरात पोहचविण्यामध्ये भाऊंचा सिंहाचा वाटा होता. गावागावात आठवडा बाजार असावा ही संकल्पना स्व. प्रभाकर पाटील यांनी प्रत्यक्षात उतरविली. आजही जिल्ह्यात ५० वर्षाहून अधिक काळ असलेले आठवडे बाजार मोठ्या दिमाखात सुरु आहेत. कृषीवलच्या माध्यमातून तर त्यांनी नवोदित साहित्यिकांना मुक्त व्यासपीठ मिळवून दिले. कोमसापचे तिसरे अधिवेशन भरविण्यामध्ये स्व. प्रभाकर पाटील यांचे मोलाचे योगदान होते. स्व. प्रभाकर पाटील यांनी महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.चे उपाध्यक्ष, जिल्हा कबड्डी असो.चे अध्यक्ष, कृषीवलचे संपादक, पोयनाडचे सरपंच, महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँकेचे संचालक, महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्सचे संचालक अशी अनेक पदे त्यांनी खंबीरपणे सांभाळली. २१ फेब्रुवारी २००० मध्ये भाऊंचे निधन झाले. निधनाच्या आदल्या दिवशी महाड पत्रकार संघातर्फे सि.म. परांजपे पुरस्कार देऊन भाऊंचा सन्मान करण्यात आला होता. भाऊ तथा स्व. प्रभाकर पाटील यांना त्रिवार अभिवादन.

## निवडक




### प्रथमेश म्हात्रेची उल्लेखनीय कामगिरी

**उरण :** म्हैसूर विद्यापीठ येथे दि. ९ ते १३ फेब्रुवारी दरम्यान आंतरविद्यापीठ साउथ वेस्ट झोन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश म्हात्रे याने उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव देशपातळीवर झळकवले आहे. या महोत्सवात प्रथमेशने मातीकाम स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला असून पोस्टर मेकिंग स्पर्धेत चतुर्थ स्थान मिळवले आहे. महत्त्वाचे म्हणजे मुंबई विद्यापीठाने या महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद मिळवले, त्यात प्रथमेशचे योगदान मोलाचे ठरले. या अभूतपूर्व यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, कॉलेज विकास समितीचे भावना घाणेकर, कॉलेज विकास समितीचे सदस्य व माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष सुधीर घरत, प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुजाता पाटील तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व सदस्यांनी प्रथमेशचे मनःपूर्वक अभिनंदन केले.



### स्वामी समर्थ ग्रंथालयात काव्यवाचन

**अलिबाग :** स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालय आणि शब्द सखी वाचन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने चेंढरे येथे 'जल्लोष कविताचा' या स्वरचित काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे बुधवारी (दि.१८) आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जवळपास १६ कवींनी आपल्या 'ऋतू व उत्सव नात्याचा' या विषयांवर आधारित स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या एफ रेडीओवरील शीघ्र कवि डॉ.स्मिता सहस्रबुद्धे यांनी त्यांच्या काव्यसंग्रहातील कविताचे वाचन केले. तर, श्रीपरेश पवार यांनी उत्तम प्रकारे ऋतू विषयावरील कविताचे सादरीकरण केले. त्यांनतर श्रुती राजे यांनी, ऋतू व उत्सव नात्याचा या विषयावर परस्पर संबंधित गुंफुण रचलेल्या कवितेचे प्रभावी गायन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी, ग्रंथालय विषयी माहिती व अन्य कार्यक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथालयाचे अध्यक्ष दिपक कुलकर्णी यांनी केले. तर, सूत्रसंचालन योती आमले यांनी केले.



### युनियन बँकेच्या सेवेचा बोजवारा

**माथेरान :** माथेरानमध्ये एकमेव राष्ट्रीयकृत युनियन बँक असून नेहमीच या बँकेत सेवेचा बोजवारा पहावयास मिळत आहे. येथील ग्राहकांना कोणत्याही प्रकारची सेवा उपलब्ध होण्यास दिरंगाई आणि वेळ लागत असल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. माथेरान हे पर्यटनक्षेत्र असल्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते. आताच्या डिजीटल युगात सहसा कुणीही रोख रक्कम स्वतःजवळ ठेवत नसल्याने पर्यटक माथेरानमधी युनियन बँकेच्या भरवशावर अवलंबून असतात. परंतु, या बँकेचे एटीएम नेहमीच तांत्रिक कारणास्तव अथवा नेटवक नसल्यामुळे बंद असते. याच बँकेची छोटी शाखा एका कुटूंबाकडे देण्यात आली असून त्याठिकाणी सुद्धा अनेकदा सर्व्हर डाऊन असते. त्यामुळे काही व्यवहारांची कामे पूर्ण होत नाहीत. येणाऱ्या पर्यटकांना एटीएममधून पैसे उपलब्ध होत नसल्याने त्यांना बाजारात काही वस्तूंची खरेदी करता येत नाही. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमधून देखील या बँकेच्या अकार्यक्षम सुविधेबाबतीत तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

# कांदा, तोंडलीच्या उत्पादनात घट

## बदलत्या वातावरणामुळे पिकावर व्हायरसचे संकट

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जिल्ह्यात पांढरा कांदा व तोंडलीचे उत्पादन सूरू झाले असून या मालाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मात्र, उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याची माहिती समोर आली आहे. अवकाळी पावसासह बदलत्या वातावरणामुळे कांद्यासह तोंडलीच्या उत्पादनात ३० टक्के घट झाली आहे. त्यामुळे कांदा व तोंडलीचा माल अपूरा पडत आहे. यंदा दोन्ही उत्पादनाला भाव चांगला असताना माल नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असल्याचे बोलले जात आहे.

चविष्ट, गुणधर्मयुक्त म्हणून अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची ओळख आहे. त्यामुळे अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला प्रचंड मागणी आहे. स्थानिकांसह पर्यटकांकडून अलिबागचा पांढरा कांदा मोठ्या प्रमाणात खरेदी केला जातो. अलिबाग तालुक्यामध्ये यंदा ३१५ हेक्टरहून अधिक क्षेत्रामध्ये कांद्याचे उत्पादन घेतले आहे. ८०० हून अधिक शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली आहे. यंदा पाऊस लांबणीवर गेल्याने कांद्याची रोपे कुजून गेली. त्यामुळे कांद्याची दुबार लागवड उशिरा झाली. गेल्या पंधरा दिवसांपासून कांदा तयार होऊन पुण्याच्या बाजारात पाठविण्यात आला आहे. ५०० हून अधिक कांद्याच्या माळा पाठविण्यात आल्या आहेत. यंदा एका माळी मागे २५० रुपयांचा भाव मिळत आहे. एक खंडी म्हणजे ८० माळी मागे २० हजार रुपये शेतकऱ्यांना मिळत आहे. सौदीमधून देखील २८ टन हून अधिक मागणी आहे. मात्र, यंदा बदलत्या हवामानामुळे कांद्याच्या उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. पांढऱ्या कांद्याचे ३० टक्के उत्पादन कमी झाल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

> **तोंडलीला यंदाही प्रचंड मागणी असून चांगला भाव आहे. मात्र, उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली असून मालाचा तुटवडा निर्माण झाला आहे. तोंडलीचे मांडव पिवळे पडत आहे. त्यामुळे उत्पादन आणखी घटण्याची भिती निर्माण झाली आहे. यंदा बदलत्या वातावरणाचा कांद्याच्या उत्पादनावर देखील परिणाम झाला आहे.**
>
> **– सतिश म्हात्रे, शेतकरी**



तसेच, अलिबाग तालुक्यात तोंडलीचे देखील मोठ्या प्रमाणात उत्पादन काढले जाते. नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून तोंडलीची लागवड केली जाते. तालुक्यामध्ये २५० हेक्टर क्षेत्रामध्ये तोंडलीची लागवड केली असून ५०० हून अधिक तोंडली उत्पादक शेतकरी असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे. पाऊस लांबणीवर गेल्याने तोंडलीचे उत्पादनही यंदा उशिरा घेण्यात आले होते. बाजारात वेगवेगळ्या भावामध्ये जाडी व कळी अशा दोन प्रकारामध्ये तोंडली विकली जात आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तोंडली बाजारात विक्रीला सुरुवात झाली आहे. तोंडलीच्या उत्पादनावर बदलत्या वातावरणाचा परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तोंडलीवर व्हायरसचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. तोंडलीचे मांडव पिवळे पडत असून तोंडली गोल बनत आहेत. त्यामुळे उत्पादनात २५ टक्के घट होण्याची भिती निर्माण झाली आहे. यंदा तोंडलीला किलोमागे ८० ते ९० रुपये भाव मिळत आहे. परंतु, उत्पादन कमी असल्याने ते बाजारात शंभर टक्के पोहचविणे कठीण होऊन बसले असल्याचे सांगण्यात आले आहे.

> **यंदा पाऊस लांबणीवर गेला. त्यामुळे कांदा व तोंडली उत्पादनावर त्याचा परिणाम झाला. यावर्षी या दोन्ही पिकांचे उत्पादन पंधरा दिवस ते एक महिना उशीला निघाले. त्यामुळे उत्पादनात २५ ते ३० टक्के घट झाली आहे. तोंडली व अन्य पिकांवर काही परिणाम झाला असल्यास शेतकऱ्यांशी सोशल मिडीयाचा आधार घेत संवाद साधून वेगवेगळ्या उपाययोजना करण्याच्या सुचना दिल्या जात आहेत.**
>
> **– मोहन सुर्यवंशी, मंडळ कृषी अधिकारी**

# नायब तहसीलदारांनी शाळा घेतली दत्तक

- **सुधाकर राठोड यांची दगडी शाळेला भेट**
- **पाहणी करत विद्यार्थ्यांबरोबर साधला संवाद**

| रसायनी | प्रतिनिधी |

चौक येथील ऐतिहासिक दगडी शाळा खालापूर निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दत्तक घेतली असून, त्यांनी शाळेला भेट देऊन शाळेची पाहणी केली. त्यांच्यासोबत चौकचे महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप हे देखील उपस्थित होते.



रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतील 'शाळा दत्तक' योजने अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात प्रेरणा दिन साजरा केला जात आहे. त्याचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा चौकचे दत्तक पालकत्व निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्याकडे असून त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ही नियोजित भेट होती. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी, हितचिंतक, ग्रामस्थ, आवर्जून उपस्थित होते. शाळेच्या भौतिक गरजांची पाहणी करत आवश्यक बाबींचा पाठपुरावा, चर्चा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आढावा घेण्यात आला. शाळेला आवश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी मदत मिळवण्या बाबत चर्चा झाली व नियोजन करण्यात आले. शाळेची पाहणी करत विद्यार्थ्यांबरोबर देखील संवाद साधला.

# मोकाट गुरांमुळे शेतकरी संतप्त

- **यावर तोडगा काढण्यासाठी सभेचे आयोजन**

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यासह देवकान्हे परिसरातील शेतकरी मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे चांगलेच आक्रमक झाले आहेत. ही मोकाट गुरे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करत असल्याने शेतकरी संतापले आहेत. त्यांच्या बंदोबस्तासाठी संबंधित खात्याला लवकरच लेखी निवेदन देणार असल्याचे सांगण्यात आले आहे. देवकान्हे या भागात कालव्याला पाणी सोडण्यात आले असल्याने शेतकरी वर्गाने भातशेती, भाजी पाला व कलिंगड पीके घेतली आहेत. मोकाट गुरांमुळे शेतकरी वर्गाचे नुकसान होत आहे. त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यासाठी सभेचे आयोजनक करण्यात आले होते. यावेळी तळवलीचे माजी सरपंच धनाजी लोखंडे, वसंतराव मरवडे, देवकान्हेचे माजी उपसरपंच बाळा भोईर, तळवलीचे सरपंच रवींद्र मरवडे, किशोर भोईर, डॉ. श्याम लोखंडे, धोंडू कचरे, संतोष भोईर, पांडुरंग गोसावी, तळवली येथील पशु वैद्यकीय दवाखान्याचे अधिकारी डॉ. एस.पी. जाधव, महेश मरवडे, दयाराम मरवडे, दयाराम भोईर आदींसहयेथील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

# तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत चौक राज्यमार्गावर बुधवारी (दि.११) एसटी बसने इर्टिगा गाडीला धडक दिली होती. या अपघातात इर्टिगा गाडी चालक रिंकू सिंह तसेच सहकारी मित्राला जबर अपघात झाला होता. गेली दहा दिवस रिंकू सिंह हा मृत्यूशी झुंज देत होता. मात्र, त्याची झुंझ अपयशी ठरली असून त्याचा गुरूवारी (दि.१९) उपचारादम्यान दुर्दैवी मृत्यू झाला.



नेरळ येथील रिंकू सिंग बुधवारी आपल्या कामगाराला सोबत घेऊन एर्टिगा गाडीने वांगणी येथून चौककडे चालला होता. त्यावेळी समोरून येणाऱ्या एसटीने ओव्हरटेक करीत असताना रिंकू याच्या एर्टिगा गाडीला जोरदार धडक दिली. या अपघातात रिंकू सिंह हा गंभीर दुखापतग्रस्त झाल्याने त्याला रायगड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी पनवेल येथील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. परंतु, रिंकू सिंह याच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत नसल्याने त्याला मुंबई येथील केईएम रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, त्याठिकाणी उपचार सुरू असताना रिंकू याचा मृत्यू झाला.

# पालीतील नेटवर्क 'नॉट रिचेबल'

| पाल/बेणसे | प्रतिनिधी |

पाली परिसरात जिओच्या नेटवर्कची सध्याची अवस्था तांत्रिक बिघाडापुरती मर्यादित न राहता थेट ग्राहकांच्या संयमाची परीक्षा घेणारी ठरत आहे. मोबाईलवर सतत दिसणारा 'नॉट रिचेबल' हा संदेश, वाढते कॉल ड्रॉप्स आणि वारंवार ठप्प होणारी इंटरनेट सेवा ग्राहकांचे रोजचे वास्तव बनले आहे. वर्षभराचे प्लॅन भरूनही फोन उपयोगात येत नसेल, तर ग्राहकांनी पैसे नेमके कशासाठी भरायचे, हा मूलभूत प्रश्न उभा राहत आहे.

# सभांचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात यावे

| माथेरान | प्रतिनिधी |

राज्यातील विविध नगरपालिका क्षेत्रात ज्यावेळी विविध विषयांवर महत्वपूर्ण निर्णय अथवा विकासकामे होण्यासाठी सभा आयोजित करण्यात येते, त्याबाबत इत्यंभूत माहिती गावातील जनतेला माहीत होण्यासाठी या सभा थेट प्रक्षेपण द्वारे सर्वसामान्यांना दाखविण्यात येते. त्याच धर्तीवर माथेरानमध्ये सुद्धा नगरपरिषदेच्या सभागृहात होणाऱ्या सभांचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात यावे, अशी मागणी येथील उद्योजक भास्कर शिंदे यांनी केली आहे.

अनेकदा काही महत्वपूर्ण कामे परस्पर एखाद्या मर्जीतील ठेकेदाराला



- **माथेरानचे भास्कर जाधव यांची मागणी**

सुपूर्द केली जातात आणि त्यामागे खुप काही गौडबंगाल दडलेले असते. त्यामुळे होणारी विकासकामे नियोजनशून्य होऊन निधीचा अपव्यय होत असतो. ज्यावेळी सभांचे आयोजन करण्यात येते त्यावेळी चालू सभेत लोकनियुक्त सदस्य अधिकाऱ्यांचे लांगुलचालन तर करीत नाही ना? किंवा एखाद्या अधिकाऱ्यांच्या दबावाखाली कोणता सदस्य नाही ना? याची शहानिशा होण्यासाठी सभागृहात होणाऱ्या सभांचे थेट प्रक्षेपण केल्यास निवडून दिलेले लोकप्रतिनिधी खरोखरच आत्मीयतेने कामे करतात की नाही, याचे ज्ञान आणि माहिती प्रत्येक घटकापर्यंत पोहोचेल. त्यासाठी आगामी काळात होणाऱ्या प्रत्येक सभांचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. सत्ताधारी गट काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# योगेश डाकी यांचा जागतिक विक्रम






| नागोठणे | प्रतिनिधी |

शेतपळस येथील योगेश डाकी यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाची भव्य रांगोळी साकारून जागतिक विक्रमाला गवसणी घातली आहे. मुंबईतील सीवूड मॉलमध्ये देशाच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला ८० किलोग्राम विविध रंगांचा वापर करून १४ सहकार्यांच्या मदतीने ४८ तासांच्या अथक मेहनतीतून तब्बल २,५३० फुट एवढी ही रांगोळी साकारण्यात आली. कलाकार योगेश डाकी यांनी काढलेल्या 'वर्ल्ड्स बिगेस्ट रांगोळी ऑफ इंडियन वूमेन्स क्रिकेट टीम' या रांगोळीने जागतिक विक्रमाची नोंद करत इतिहास घडविला आहे. 'बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या संस्थेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अविनाश साकुंडे यांच्या सहीचे प्रमाणपत्र योगेश डाकी यांना देण्यात आले आहे. ही केवळ रांगोळी नव्हती तर, भारताच्या महिला शक्तीला दिलेला हा मानाचा मुजरा होता.

# आसूडगावातील इंटरनेट बारवर छापा

| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |

आसूडगाव, सेक्टर-४ येथील एका इंटरनेट बारवर पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत बारमधील अश्लील प्रकार उघडकीस आला असून एकूण १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१५) मध्यरात्रीच्या सुमारास या बारमध्ये काही महिला अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यामाहितीनुसारपोलिसांच्या पथकाने तत्काळ इंटरनेट बारवर छापा टाकला. या छाप्यादरम्यान चार महिला अश्लील हावभाव करताना आढळून आल्या. तसेच, बार मॅनेजर आणि काही कर्मचारी या प्रकारास प्रोत्साहन देत असल्याचेही निदर्शनास आले. यादरम्यान, काही ग्राहकांनी घाईघाईने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत पुढील कारवाई केली. या प्रकरणी ९ महिला गायक, मॅनेजर सुरेश वासू शेट्टी, वेटर अरुण पासवान आणि मुन्ना चौधरी यांच्याविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

# स्वच्छतेचे काम युद्धपातळीवर

| महाड | प्रतिनिधी |

महाड येथील विरेश्वर छबिनोत्सवाची सांगता होताच, महाड नगरपालिकेने स्वच्छतेच्या कामास युद्ध पातळीवर सुरुवात केली आहे. छबिन्यानिमित्त भरलेल्या यात्रेतील दुकाने आता हळुहळू उठू लागली आहेत. त्यामुळे यात्रेच्या मुख्य भाग असलेला गाडीतळ परिसर मोकळा होऊ लागला आहे. नगरपालिकेचे सुमारे ३० स्वच्छतादूत आणि सुमारे १५ कंत्राटी स्वच्छतादूत ही सफाईची कामे करित आहेत. गोळा केलेला कचरा व्यवस्थापन केंद्रात नेण्यात आला.

# ज्याला त्याला हवे आहे सोने

भारतीय लोकांचे सोन्याचे वेड जगात विख्यात आहे. सोन्याची सर्वाधिक आयात करणाऱ्या देशांपैकी आपण एक आहोत. सध्या कुठल्याच गुंतवणुकींचा भरवसा न उरल्याने नवीन पिढीही झपाट्याने सोन्याकडे वळू लागली आहे. शेअर बाजार सतत वरखाली होतो आहे. एआयच्या आगमनानंतर आयटी कंपन्यांचे शेअर्स कोसळत आहेत. त्यात ट्रम्प यांच्या आयातशुल्कांमुळे जगातल्या सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थांची वाट लागली आहे. बँका व पोस्टातील ठेवी वगैरेंचे व्याज पुरेनासे झाले आहे. जमिनींमधील गुंतवणूक फायदेशीर आहे. पण तिच्यात बऱ्याच कटकटी असतात. शिवाय विकले शेअर्स की मिळाले पैसे असे तिच्याबाबतीत होत नाही. त्यामुळे सोने हीच भरवशाची गुंतवणूक वाटू लागली आहे. त्यातच जगात तेलाचे भाव बऱ्याच काळापासून स्थिर असून उलट खालीच येत आहेत. याचा परिणाम म्हणजे तेलाच्या सौदेबाजीवर नफा मिळेनासा झाला आहे. अमेरिका, युरोपातले लाखो कोटी रुपये याच व्यवहारात आजवर खेळत असत. ते पडून राहू लागले. मग त्यातून सोन्याची खरेदी सुरु झाली व पूर्ण जगातच सोन्याच्या भावात तेजी आली. वास्तविक सोने हा एक इतर कोणत्याही धातूंसारखाच धातू आहे. पण इतिहासकाळापासून सोने म्हणजे मौल्यवान असा एक समज प्रचलित झाला आहे व तो आजच्या युगातल्या गुंतवणूकदारांच्याही चांगलाच फायद्याचा आहे. याचा परिणाम म्हणून सोन्याचे भाव एका तोळ्याला सध्या दीड लाखांच्याही वर गेले आहेत. भारतात कोणत्याही घरातील लग्न सोन्याच्या खरेदीशिवाय पुरे होत नाही. पण आता ही खरेदी करणे सामान्य गरिबांना केवळ अशक्य होऊ लागले आहे. सोने हे शेअर बाजारातल्यासारखा एक खरेदी-विक्रीचा आयटम बनल्यामुळे ते सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. तीच कथा चांदीचीही आहे. चांदीला इतकी वर्षे सोन्याच्या तुलनेत कमी भाव होता. पण आता तिचीही चांदी झाली आहे. येत्या काळात हे भाव किती वर जातील याचे वाट्टेल ते अंदाज बांधले जात आहेत. पण उद्या समजा दोन लाख रुपये तोळा किंवा दहा ग्रॅम असा भाव झाला तर ते बहुदा दागिन्यांच्या बाजारातून हळूहळू कमी दिसू लागेल. केवळ श्रीमंतांनाच परवडू शकेल असा हा प्रकार होऊन जाईल.

### इटीएफची क्रेझ

पूर्वी लोक सोन्यात म्हणजे सोन्याच्या दागिन्यांमध्ये पैसे गुंतवत असत. दागिने करण्याचा एक फायदा असा असे की खूपच वाईट स्थिती आली तरच ते विकले जात असत. हा म्हटले तर तोटाही होता. कारण एकदा सोन्यात केलेली गुंतवणूक अडकून पडत असे. याच रीतीने भारतातील कोट्यवधी कुटुंबांमध्ये लाखो कोटी रुपयांचे सोने दागिन्यांच्या रुपाने अडकून पडलेले असावे असा अंदाज आहे. देवळे, स्वामींचे मठ अशांकडचे सोने हा आणखी वेगळा विषय आहे. पण नव्या पिढीने सोन्याकडे भावनिक वा धार्मिक रीतीने पाहण्याचे कमी केले आहे. हा बदल ओळखूनच आता अनेक बँका व वित्तीय संस्थांनी एक्स्चेंज ट्रेडेड फंड्स अर्थात इटीएफ काढले आहेत. हे फंड्स सोन्यात पैसे गुंतवतात व सोन्याच्या किमतीत जशी वाढ होईल त्यानुसार गुंतवणूकदाराला पैसे मिळतात. आपले एरवीचे म्युच्युअल फंड्स हे शेअर्स किंवा सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक करतात आणि त्यांचे भाव वाढतील तसा परतावा देतात. इटीएफ हे फक्त सोन्यात गुंतवणूक करतात. १८ वर्षांपूर्वी म्हणजे २००७ मध्ये या फंड्सची सुरुवात झाली. हे इटीएफ फंडवाले गुंतवणुकीइतक्या रकमेचे सोने खरेदी करीत असल्याने भारतातील त्याच्या मागणीत कमालीची वाढ झाली आहे. हे सोने अर्थातच मोठ्या प्रमाणात आयात केले जाते. स्वित्झर्लंड, संयुक्त अरब अमिरात इत्यादी देशांमधून ही आयात होते. यंदाच्या जानेवारीत कहर झाला. डिसेंबरच्या तुलनेत, म्हणजे अवघ्या एका महिन्यात सोन्याची ही आयात तिपटीने वाढून बाराशे कोटी डॉलरच्या वर गेली. गेल्या काही दिवसात आपल्या रुपयाची किंमत कमी होण्याचे हेही एक कारण आहे. कारण सोन्याच्या खरेदीसाठी डॉलर्स लागतात व साहजिकच मागणी वाढल्याने रुपयाच्या तुलनेत डॉलर्सचा भाव वाढतो. अर्थात इटीएफखेरीजही आपल्याकडे तुफान सोने खरेदी केले जात असते. इटीएफमधील सोन्याची आयात एकूण सोन्याच्या आयातीच्या अवघी २२ टक्के आहे. जानेवारीमध्ये एकूण सोन्याची आयात एक लाख कोटी रुपयांची होती. त्यातले सुमारे २४ हजार कोटी रुपये इटीएफमधून आलेल्यापैकी होते. गंमत म्हणजे आता म्युच्युअल फंडात दर महिन्यात पडणाऱ्या पैशांपेक्षाही सोन्याच्या इटीएफमध्ये पडणारे पैसे अधिक झाले आहेत.

### सगळ्यांनाच फटका बसेल

यापूर्वी मोदी सरकारने २०१५ मध्य सॉव्हरिन गोल्ड बाँड स्कीम काढली होती. लोकांनी सोन्यामध्ये थेट पैसे टाकण्यापेक्षा तेवढे पैसे बँकांमध्ये ठेवावेत. पाच वर्षांनंतर सोन्याची जी काही किंमत वाढली असेल ती अधिक थोडे व्याज असे म्हणून या बाँडमधील रक्कम परत काढता येईल अशी ही सुविधा होती. म्हणजे २०१५ मध्ये एक लाख रुपयात समजा दोन तोळे सोने आले असते. तर त्या दोन तोळे सोन्याची जी किंमत २०२० किंवा २२ मध्ये होईल तितकी रक्कम ग्राहकाला पैशांच्या रुपात बँका परत करता येतील अशी ही योजना होती. यात सोन्याची किंमत ही संदर्भापुरती होती. बँकांना प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याची गरज नव्हती. त्यामुळे देशाच्या परकीय चलनाची बचत होईल असे मोदी सरकारचे म्हणणे होते व ते खरे ठरले. पण आता सोन्याच्या दरात इतकी प्रचंड वाढ झाली की असा परतावा देणे बँकांना अशक्य होऊ लागले. त्यामुळे २०२४ मध्ये ही योजना बंद करण्यात आली. त्याचाच परिणाम म्हणून आता इटीएफमधली खरेदी वाढली आहे. परिणामी सोन्याची प्रत्यक्ष खरेदी उर्फ आयात वाढली आहे. त्याचा परिणाम म्हणजे आपल्या आयात निर्यात व्यापारातील तूट झपाट्याने वाढू लागली आहे. सध्या ती ३५०० कोटी डॉलर्स इतकी आहे. या तुटीमुळे रुपया खाली कोसळत जाऊन सरकार व कंपन्यांचे खर्च वाढणार आहेत. त्यातून देशातला विकास कामांसाठी उपलब्ध असणारा पैसा कमी होणार आहे. साहजिकच रोजगारही घटणार आहे. म्हणजे हे एक दुष्टचक्र आहे. एकीकडे सोने सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर जाणार आहेच, शिवाय, रोजच्या जगण्यातले डाळ-तांदुळही त्यांच्यासाठी महाग होणार आहेत. आयटी क्षेत्रातले पैसेवाले लोक इटीएफसारख्या योजनांमध्ये अमर्याद पैसे गुंतवू शकतील. त्यावर भरमसाठ नफा मिळवू शकतील. पण या मूठभर लोकांपायी देशाच्या अर्थव्यवस्थेत गोंधळ निर्माण होणार आहे. अंतिमतः त्याचा फटका या आयटीवाल्यांनाही बसणार आहेच. तसेही एआयच्या आगमनानंतर आयटी कंपन्यांनी नवीन भरती एकदम कमी करून टाकली आहे. येत्या दोन-तीन वर्षात स्थिती अधिक बिकट होण्याचा धोका आहे. आपला सोन्याचा हव्यास आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे हे लक्षात घ्यायला हवे.

## विचार

# वार्ता आणि वास्तव

**महेश देशपांडे**

*अलिकडच्या काळात अर्थनगरीमध्ये प्रत्ययाला आलेली काही तथ्ये अधिक महत्वाची आहेत. जीवनावश्यक वस्तूंपेक्षा सोने-चांदी महागाईला जास्त जबाबदार ठरतात, हा असा पहिला महत्वाचा साक्षात्कार म्हणता येईल. दरम्यान, काही कंपन्यांचा 'एआय'संदर्भात होणारा खर्च भारताच्या अर्थसंकल्पाइतका असल्याचेही दिसून आले आहे. तिसरी दखलपात्र बाब म्हणजे भारत-अमेरिका व्यापार करारामुळे ऑटो निर्यात वाढणार आहे.*



अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये नव्या बातम्यांची जंत्री होतीच, मात्र त्यापेक्षा प्रत्ययाला आलेली काही तथ्ये अधिक महत्वाची ठरली. जीवनावश्यक वस्तूंपेक्षा सोने-चांदी महागाईला जास्त जबाबदार ठरतात, हा असा पहिला महत्वाचा साक्षात्कार म्हणता येईल. दरम्यान, काही कंपन्यांचा 'एआय'संदर्भात होणारा खर्च भारताच्या अर्थसंकल्पाइतका असल्याचेही दिसून आले आहे. तिसरी दखलपात्र बाब म्हणजे भारत-अमेरिका व्यापार करारामुळे ऑटो निर्यात वाढणार आहे.

सध्या देशात सोन्या-चांदीसह अन्नधान्याच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. महागाईची चर्चा केली जाते, तेव्हा टोमॅटो, कांदे, बटाटे आणि डाळींच्या किमती सर्वात आधी लक्षात येतात. दरम्यान, रिझर्व्ह बँकेने वाढत्या महागाईच्या संदर्भात महत्वाची माहिती दिली आहे. रिझर्व्ह बँकेच्या मते, भाज्या किंवा अन्नपदार्थांपेक्षा सोने आणि चांदीच्या वाढत्या किमतींमुळे महागाईवरील दबाव वाढत आहे. फेब्रुवारीच्या पतधोरण बैठकीत रिझर्व्ह बँकेने स्पष्टपणे सांगितले की, दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती बहुतांश नियंत्रणात असल्या, तरी मौल्यवान धातूंच्या किमती विशेषतः सोने आणि चांदीच्या किमती, महागाईच्या आकडेवारीवर परिणाम करत आहेत. सध्याच्या परिस्थितीमध्ये अन्नधान्य महागाई ही मोठी चिंता नाही. कारण खरीप हंगामातील चांगले पीक आणि रब्बी पिकांची चांगली पेरणी यामुळे सरकारकडे पुरेसा धान्यसाठा आहे. या सर्व घटकांमुळे, येत्या काही महिन्यांमध्ये डाळी, तांदूळ, गहू आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर मोठ्या प्रमाणात नियंत्रणात राहण्याची अपेक्षा आहे. टोमॅटो आणि कांदे यांसारख्या भाज्यांच्या किमती अचानक वाढण्याचा धोका असला, तरी रिझर्व्ह बँक सध्या ही मोठी समस्या मानत नाही. रिझर्व्ह बँकेच्या मते, सोने वगळता, कोअर इन्फ्लेशन डिसेंबरमध्ये सुमारे २.६ टक्के राहिले. ती एक सुरक्षित पातळी आहे. सोने आणि चांदीचा समावेश केला जातो, तेव्हा मात्र चित्र बदलते. या मौल्यवान धातूंच्या किमती उच्च राहिल्या आहेत. त्यामुळे ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय)वर परिणाम होत आहे आणि चलनवाढीचे आकडे वरच्या दिशेने जात असल्याचे दिसून येते.

गेल्या वर्षभरात जगभरात अनिश्चितता लक्षणीयरीत्या वाढली. युद्ध, भू-राजकीय तणाव, आर्थिक मंदीची भीती आणि जागतिक बाजारातील चढ-उतार यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित आश्रयस्थान शोधण्यास प्रवृत्त झाले आहेत. अशा वातावरणात सोने आणि चांदी नेहमीच पसंतीचा पर्याय असतात. कमकुवत डॉलर, भविष्यात कमी व्याजदरांची अपेक्षा आणि आर्थिक जोखमीची भीती यामुळे या दोन्ही धातूंची मागणी आणखी वाढली आहे. परिणामी, अलिकडच्या काळात थोडीशी घट झाली असली तरी देशांतर्गत बाजारात त्यांच्या किमती विक्रमी पातळीवर पोहोचल्या आहेत. सोने आणि चांदीच्या किमती केवळ उच्चच नाहीत, तर लक्षणीय चढ-उतारदेखील अनुभवत आहेत. कधी अचानक वाढ, कधी तीव्र घसरण. ही अस्थिरता महागाईविषयीचे अंदाज गुंतागुंतीचे बनवते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्येही असाच ट्रेंड दिसून येत आहे. तिथे गुंतवणूकदार बदलत्या परिस्थितीनुसार वेगाने आपली स्थिती बदलत आहेत. याचा थेट परिणाम भारतीय बाजारपेठांवर होत आहे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आकडेवारीचा सखोल विचार केल्यास दिसून येते, की महागाईला सध्या अन्नधान्यापेक्षा दागिन्यांचे वाढते भाव अधिक कारणीभूत आहेत. भाज्या आणि धान्य सध्यासाठी दिलासा देत आहेत; परंतु सोने आणि चांदीच्या वाढत्या किमतींमुळे महागाईचे आकडे वाढू शकतात. अर्थांत, रिझर्व्ह बँकेला विश्वास आहे, की एकूण महागाई नियंत्रणात राहील.

आता एक लक्षवेधी बातमी. कृत्रिम बुद्धिमत्ता हळूहळू लोकप्रिय होत आहे. कंपन्या त्याचा जलद अवलंब करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, ॲमेझॉन, गुगल, मेटा आणि मायक्रोसॉफ्टसह चार प्रमुख टेक कंपन्या २०२६ पर्यंत 'एआय' आणि संबंधित पायाभूत सुविधांच्या विकासावर ६५० अब्ज डॉलर्स खर्च करतील अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारने अलीकडेच देशाचा सामान्य अर्थसंकल्प सादर केला. त्यात संपूर्ण देशाच्या विकासासाठी अंदाजे ६७० अब्ज डॉलर्सचा खर्च निश्चित करण्यात आला आहे. याचा अर्थ सरकार संपूर्ण देशाच्या वार्षिक बजेटवर जितका खर्च करते, तितकाच खर्च टेक कंपन्या 'एआय'वर करत आहेत. अलीकडेच या सर्व प्रमुख कंपन्यांनी त्यांचे आर्थिक निकाल जाहीर केले; परंतु त्यांच्या आगामी खर्चाचा उल्लेख केला नाही. काही दिवसांपूर्वी 'गुगल'ने आपला २०२६ चा खर्च अंदाजे १८५ अब्ज डॉलर्स असेल, असे सांगितले. काही दिवसांनी ॲमेझॉनने जाहीर केले, की या वर्षी त्यांचा एकूण खर्च २०० अब्ज डॉलर्स असेल. 'मेटा'ने त्यांचा खर्च अंदाजे १३५ अब्ज डॉलर्स असेल, असे म्हटले आहे. 'मायक्रोसॉफ्ट'ला हा आकडा अंदाजे १२० अब्ज डॉलर्स असेल असे वाटते.

या निधीचा एक महत्त्वाचा भाग थेट 'एआय' पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर खर्च केला जाईल. त्यात मोठे 'डेटा सेंटर', 'हाय-एंड सर्व्हर', नेटवर्किंग उपकरणे आणि विशेष चिप्स यांचा समावेश आहे. टेक कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकल्याच्या बातम्या काही काळापासून समोर येत आहेत. अलिकडेच, 'ॲमेझॉन'ने सुमारे १६ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले. गेल्या वर्षी 'मायक्रोसॉफ्ट'ने नऊ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले. 'मेटा'ने त्यांच्या 'रिॲलिटी लॅब'मधील दहा टक्के कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या कमी केल्या. यावरून स्पष्ट होते, की कंपन्या खर्च कमी करण्यासाठी आणि 'एआय' पायाभूत सुविधांवर अधिक खर्च करण्याची परवानगी देण्यासाठी पुनर्रचनेच्या नावाखाली कामगारांना कामावरून काढून टाकत आहेत. दोन्ही देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात व्यापारातील अडथळे कमी करणे आणि बाजारपेठेत प्रवेश सुलभ करणे असे म्हटले आहे. तथापि, उद्योग सदस्यांचे म्हणणे आहे, की अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा नियमांनुसार लादलेल्या शुल्काची संपूर्ण माहितीच स्पष्ट चित्र प्रदान करण्यासाठी उपलब्ध असेल.

भारत दरवर्षी अमेरिकेला अंदाजे ६.५ अब्ज डॉलर किमतीचे वाहन घटक निर्यात करतो. त्यामुळे ती आपली सर्वात मोठी बाजारपेठ बनते. यापैकी निम्मे भाग कलम २३२ अंतर्गत २५ टक्के शुल्काच्या अधीन आहे. उर्वरित भाग पूर्वी प्रतिशोधात्मक शुल्काच्या अधीन होता. तो पन्नास टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अमेरिकेने स्पष्ट केले, की सर्व वाहन भागांवर एकसमान २५ टक्के शुल्क लागू असेल. आता या नवीन विधानात प्रतिशोधात्मक शुल्क १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे आवाहन केले आहे. याव्यतिरिक्त, त्यात कलम २३२ अंतर्गत ऑटोमोटिव्ह पार्टस्साठी विशेष टॅरिफ रेट कोटा नमूद केला आहे. तथापि, हे १८ टक्के दर फक्त प्रतिशोधात्मक पार्टस्वर लागू होईल, की कलम २३२ वस्तूंनादेखील लागू होईल हे स्पष्ट नाही. 'प्राइमस पार्टनर्स'चे सल्लागार अनुराग सिंग म्हणतात, की कलम २३२ अंतर्गत विशेष कोट्याचा उल्लेख करणे भारतीय ऑटो पार्टस् उत्पादकांसाठी एक चांगला संकेत आहे. ते म्हणाले, की प्रस्तावित कपात २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी होणे भारताला व्हिएतनामच्या २० टक्के आणि थायलंडच्या १९ टक्क्यांपेक्षा किंचित चांगल्या स्थितीत ठेवते. यामुळे कंपन्यांच्या नियोजनावर विश्वास पुनर्संचयित होईल. 'ऑटोमोटिव्ह कॉँपोनंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया'(एसीएमए) नेही अंतरिम कराराचे स्वागत केले. असोसिएशनचे अध्यक्ष आणि जेके फेनर (भारत)चे उपाध्यक्ष विक्रमपती सिंघानिया यांनी हे दोन्ही देशांमधील उत्पादन आणि पुरवठा साखळी मजबूत करण्याचे लक्षण असल्याचे वर्णन केले.

ते म्हणाले की, ऑटोमोटिव्ह पार्टस्साठी विशेष टॅरिफ कोटा, निवडक इनपुटवरील कलम २३२ टॅरिफ काढून टाकणे आणि प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराअंतर्गत टॅरिफ तर्कसंगत करण्याचा मार्ग हे उद्योगासाठी योग्य पाऊल आहेत. हे पाऊल निर्यात स्पर्धात्मकता वाढवेल, तांत्रिक सहकार्य वाढवेल आणि जागतिक ऑटो पुरवठा साखळीत भारताला एक विश्वासार्ह भागीदार म्हणून स्थापित करेल. अमेरिका हळूहळू भारतीय ऑटो घटकांचा सर्वात मोठा खरेदीदार बनला आहे. आर्थिक वर्ष २०२१ मध्ये आमची निर्यात ३.६ अब्ज डॉलर्स होती. ती २०२५ मध्ये ६.२ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढली. दरम्यान, अमेरिकेतून भारताची आयात फक्त १.५ अब्ज डॉलर्स आहे, जी स्पष्टपणे या क्षेत्रातील भारताच्या व्यापार अधिशेषाचे संकेत देते. काहीजण इशारा देतात, की खरे फायदे अमेरिकेच्या चालू कलम २३२ चौकशीच्या निकालांवर अवलंबून आहेत. तज्ज्ञांचा अंदाज आहे, की काही प्रमाणात भारतीय ऑटो पार्टस्ना कमी किंवा कदाचित शून्य शुल्कात प्रवेश मिळू शकतो.

# रस्त्यावरील कोंडीचा प्रश्न सुटेना

**प्रमोद जाधव**

अलिबाग- रोहा मार्गासह वेगवेगळ्या भागांवरील रस्त्याचे काम सुरु आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून ही कामे केली जात आहेत. सर्वत्र खोदून ठेवण्याचे काम केले आहे. रुंदीकरणाच्या नावाखाली रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडाची कटाई करण्यात आली आहे. माती धुळीने प्रवाशांना प्रचंड त्रास होत असताना वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे. तासनतास वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकांसह विद्यार्थी आदींचे प्रचंड हाल होत आहेत. गेल्या अनेक दिवसांपूसन सुरु असलेला कोंडीचा प्रश्न सुटेना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



अलिबाग - रोहा मार्गावर सध्या रस्त्याचे काम सुरु आहे. कुरुळपासून सहाण बायपास पर्यंत ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र नियोजनाच्या अभावाचा फटका या मार्गावरील प्रवाशांना होत आहे. वाहतूक कोंडीसह धुळीचा नाहक त्रास, अपघाताला सामोरे जाण्याची वेळ सर्वसामान्यांवर येत आहे. ज्या कंपनीकडून काम केले जाते, त्या कंपनीकडून सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे नियोजन केले असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अमित म्हात्रे यांनी केला आहे. प्रशासनाकडून याबाबत दखल घेण्याकडे दुर्लक्ष होत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. तोंड दाबून बुक्क्याचा मार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, असे बोलले जात आहे. अलिबाग - रोहा मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा झाडे होती. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाच्या ठरलेल्या या परिसरात सध्या धुळीचे प्रदुषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता स्वखर्चाने करून देणार असे आश्वासन शिंदे गटातील आमदार दळवी यांनी काही वर्षापुर्वी दिले होते. परंतु आजतायागत हा रस्ता आजही खड्ड्यात आहे. या रस्त्याच्या कामासाठी अनेक वेळा नारळ फोडीचा कार्यक्रमही घेण्यात आला. परंतु या मार्गावरील प्रवाशांच्या सुकर रस्त्याचा प्रश्न कायमच आहे. मागील महिन्याभरापासून सहाण बायपास रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. ज्या कंपनीला ठेका दिला आहे. त्या कंपनीकडून रस्त्याचे खोदकाम केले जात आहे. कुरुळपासून सहाणबायपासपर्यंत ठिकठिकाणी खोदकाम केल्याने धुळ प्रदुषणाचा त्रास नागरिकांना होत आहे. आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. रस्ता बनवनित असताना कोणत्याही प्रकारचे नियोजन, सुचना फलक तसेच येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांचा विचार केला जात नाही. त्यामुळे अनेक वेळा अपघाताला सामोरे जाण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

या रस्त्याचे काम सुरू आहे. बाहेरील ठेकेदारामार्फत काम सुरु आहे. मात्र कोणत्याही प्रकारचे वाहतूकीचे नियमांचे पालन न करता काम केले जात आहे. सुरक्षेची काळजी न घेता रस्त्याचे खोदकाम केले जात आहे. या रस्त्यावर कामाच्या नावाखाली खेळ खंडोबा सुरु आहे. जीवघेणा प्रवास ठरत आहे. या मार्गावर प्रवास करताना लहान मोठे अपघात झाले आहेत. पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. रस्ता होत असताना जीव जाणार नाही, याची काळजी देखील कंपनीने घेतली पाहिजे. रस्त्याचे काम सुरु असताना सर्रास वृक्षतोड केली जात आहे. नियमबाह्य काम केले जात आहे. तोंडाला मास बांधल्याशिवाय प्रवास करता येत नाही. अशी प्रतिक्रीया सामाजिक कार्यकर्ते अमित म्हात्रे यांच्यासह अनेक मंडळींकडून उमटत आहे. अलिबाग - रोहा रस्त्याच्या नूतनीकरण आणि रुंदीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. सहाणगोठी ते सहाण बायपास आणि आरसीएफ कॉलनी कुरुळ गेट ते कुरुळ वळण या दरम्यान हे काम सुरू आहे. कंत्राटदाराने सुरू केलेले काम निश्चित गुणवत्ता पूर्ण होत असलेतरी या कामाचा फटका इयत्ता बारावीचे विद्यार्थी आणि शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना बसला आहे. या कामामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याने सर्वच वाहनांना अलिबाग पर्यंत पोहचणे जिकरीचे बनले होते. १६फेब्रुवारी सोमवारी सकाळी अकरा वाजता इयत्ता बारावीचा पेपर होता. यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहचता आले नाही. खरेतर हे काम करणाऱ्या कंत्राटदाराने वाहतूक नियोजन करण्यासाठी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडे संपर्क करणे अपेक्षित होते, परंतु तसे न केल्याने या वाहतूक कोंडीचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी पायपीट करत परीक्षा केंद्र गाठण्याचा प्रयत्न केला. काही विद्यार्थ्यांना उशिराने केंद्रावर पोहचता आले. दहावीची परीक्षा शुक्रवारपासून सुरु झाली. त्या विद्यार्थ्यांनादेखील या वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. सकाळी दहा वाजता कामावर जाणाऱ्या नागरिकांना एक तास उशिरा कामावर पोहचावे लागले. त्यामुळे प्रश्न सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य पाऊल उचलावे, अशी मागणी होत आहे.

## लोकसंसद

### गलगोटिया विद्यापीठावर कठोर कारवाई करावी




खरे तर एक रोबोटिक कुत्रा गेले अनेक दिवस सोशल मीडियावर धुमाकूळ घालतो आहे. खऱ्या कुत्र्यांना घाबरवण्यासाठी करण्यात आलेले या रोबोटिक कुत्र्याचे अनेक रिल्स तुफान वायरल झाले आहेत. परंतु हा रोबोटिक कुत्रा अचानक चर्चेच्या अग्रस्थानी आला आणि प्रसारमाध्यमातून त्याचे दर्शन होऊ लागले. त्याचे कारण म्हणजे हा रोबोटिक कुत्रा मूळ चीनी कंपनी युनिट्री रोबोटिक्सचे जीओ२ मॉडेल असून देखील 'एआय' इम्पॅक्ट समिटमध्ये ग्रेटर नोएडातील गलगोटिया नामक विद्यापीठाने हा रोबोटिक डॉग त्यांच्या विद्यापीठात तयार करण्यात आल्याचा दावा केला. गलगोटियाचे पितळ उघडे पडल्यानंतर आणि चीनसह जगभरात हसे झाल्यानंतर गलगोटिया विद्यापीठाने रोबोटिक डॉगवरुन निर्माण झालेल्या वादाबद्दल माफी मागितली. 'एआय' इम्पॅक्ट समिट आयोजकांनी त्या विद्यापीठाला समिटमधून तात्काळ गाशा गुंडाळायला सांगितले. गलगोटिया विद्यापीठाने स्वतःची लाज तर घालवलीच पण 'एआय' इम्पॅक्ट समिट आयोजकांनाही तोंडघशी पाडले. सरकारने अशा देशाची इभ्रत धुळीला मिळवणाऱ्या गोलमाटोल आणि गोलमाल गलगोटिया विद्यापीठावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची पुण्यतिथी आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# चिरनेर परीक्षा केंद्रावर पोलिसांचा बंदोबस्त



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या लेखी परीक्षेला शुक्रवारी (दि.२०) पासून सुरुवात झाली आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयाच्या नियोजित परीक्षा केंद्रावरदेखील शुक्रवारपासून दहावीची परीक्षा सुरू झाली आहे. ही दहावीची परीक्षा १८ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. मराठी प्रथम भाषा विषयाच्या पेपरपासून परीक्षेला आरंभ झाला आहे.

परीक्षा केंद्र संचालक रेखा धराडे व परीक्षा उपकेंद्र संचालक आनंद चिर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक सहकार्य करीत आहेत. परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या पहिल्याच दिवशी अनेक पालक विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांचा परीक्षा क्रमांक कोणत्या ठिकाणी आहे, हे पाहण्यासाठी त्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. परीक्षेच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी परीक्षा केंद्र परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कॉपीमुक्त अभियानांतर्गत दक्षतेने पाहणी केली जात आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष पी.पी. खारपाटील यांनी दिली. चिरनेर परीक्षा केंद्रातून मराठी माध्यमाचे २२८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले आहेत. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची दहा ब्लॉकमधून आसन व्यवस्था करण्यात आली आहे. पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पी.पी. खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालक अर्चना ठाकूर, समीर खारपाटील आणि शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

# अंकुश आपटे यांच्याकडून ज्येष्ठांना मदत



**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागडमधील ज्येष्ठ व्यक्तींसाठी अंकुश आपटे अध्यक्ष आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र पुणे यांच्यावतीने सातत्याने विविध प्रकारच्या आरोग्यदायी वस्तूंचे वाटप केले जाते. अशाचप्रकारे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांना वॉकिंग स्टिक्स (आधाराची काठी), श्रवण यंत्र आणि त्यासोबतच आता नवीन सुविधा मिळावी व चांगल्या दर्जाच्या गरम पाण्याच्या इलेक्ट्रिक जेल बॅग (हॉट वॉटर बॅग) यांचे वाटप केले. ज्या गावाच्या मातीत खेळून अंकुश दादा आपटे लहानाचे मोठे झाले त्या मातीचे ऋण फेडण्याचं कार्य सातत्याने ते करत आहेत. त्याचमुळे वरच्या देऊळवाड्यामध्ये सर्व ज्येष्ठ व्यक्तींना मायेचा आधार मिळावा, यासाठी शिवजयंतीच्या निमित्ताने भव्य दिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये त्यांनी आता आधुनिक काळानुसार उत्तम दर्जाच्या इलेक्ट्रिकल जेल बॅग पाच मिनिटात गरम होऊन दीड तास ती गरम राहते अशा ७० जेल बॅगचे वाटप केले. येत्या काळामध्ये आणखीही मोठ्या प्रमाणात सामाजिक उपक्रम हाती घेण्याचा आपटे यांचा मानस आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२१ फेब्रुवारी**

१) श्री.यशवंत जयराम पाटील
ब्राम्हणआळी, ता.अलिबाग,
दि.२१-२-१९४२
२)श्री.आत्माराम खुशाल महाजन
श्रीबाग-२, अलिबाग, रायगड
दि.२१-२-१९४३
३)श्रीम.शुभांगी यशवंत आंब्रे
मु.खंडाळा, अलिबाग
दि.२१-२-१९४४
४)श्रीम.माधवी रमेश परांजपे
महादेवआळी, अलिबाग
दि.२१-२-१९५१
५)स्नेहल सुरेश पाटील
चेंढरे, अलिबाग
दि.२१-२-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**प्राजक्ता लोखंडे, स्मरणार्थ अलिबाग**

पान १ वरून

## ९ कोटींचा आराखडा

५८ हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. त्यात ३०६ गावे व वाड्यांचा समावेश आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ९४७ गावे व वाड्यांसाठी पाच कोटी, २० लाख, ९२ हजार रुपयांचा अपेक्षीत खर्च आहे.

जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. धरणांसह अन्य पाण्यांच्या स्त्रोतांमधील पाणी टंचाईची समस्या जाणवू लागली आहे. त्यामुळे प्रशासनाने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. जिल्ह्यामध्ये नऊ कोटी ३० लाख रुपयांचा पाणी टंचाई संभाव्य आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यापासून सार्वजनिक विहीरी खोल करणे, गाळ काढणे, नवीन विंधन विहिरी घेणे तसेच विशेष दुरुस्ती करणे अशा अनेक प्रकारची कामे केली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## दहावीचे विद्यार्थी वाहतूक कोंडीत

करावी अशी मागणी केली जात आहे.

दहावीची परीक्षा शुक्रवारपासून सूरू झाली आहे. पहिल्या दिवशी मराठी पेपर सकाळी अकरा वाजता होता. त्यामुळे अनेक विद्यार्थी सकाळी लवकरच घरातून निघाले. परीक्षा केंद्रांवर वेळेवर पोहोचण्यासाठी काहीजण एसटी बसने तर काहीजण खासगी वाहनाने अलिबागकडे जात होते. मात्र बेलकडेपासून कुरूळपर्यंतच्या रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली. अनेक वाहने अर्धा ते पाऊण तास एकाच जागेवर उभी राहिली होती. परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल झाले. साडेनऊ वाजत आले, तरी काही विद्यार्थ्यांना अलिबाग गाठता आले नाही. अलिबाग-रोहा मार्गावरील सहान बायपास ते अलिबाग पर्यंत रस्त्याचे काम सुरू आहे. सर्वच ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. त्याचा मोठ्या प्रमाणात वाहतूकीवर परिणाम झाला. कुरुळ जवळ ठेकेदाराने मातीचा भराव केला होता. त्यामुळे वाहने पुढे जाण्यास अडथळा निर्माण झाला होता. या वाहतूक कोंडीबाबत विद्यार्थ्यांसह नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या. परंतु जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही. कुरूळ-अलिबाग रस्त्यावर झालेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवासी व विद्यार्थी त्रस्त झाले होते. या वाहतूक कोंडीमध्ये दहावीचे विद्यार्थी अडकल्याचे बोलले जात आहे. अखेर कुरुळ गावातून पर्यायी रस्ता काढल्यानंतर ही वाहतूक कोंडी सुटली. मात्र सकाळच्या वेळेला व संध्याकाळी कामावरून घरी जाणाऱ्या नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे. ही कोंडी सोडविण्यास वाहतूक पोलीस अपयशी ठरत असल्याची प्रतिक्रीया उमटत आहेत. अपूऱ्या मनुष्यबळाचा फटका बसत आहे. अलिबाग शहरासह परिसरातील व आजूबाजूच्या मार्गावरील वाहतूक कोंडी तीन वाहतूक पोलीसांच्या भरोवश्यावर सोडविली जाते. त्यामुळे ही कोंडी सोडविताना या कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या परिसरात अधिक वाहतूक पोलीस नेमण्यात यावेत, अशी मागणी होत आहे.

अलिबाग - रोहा मार्गावरील कुरुळपासून सहाणबायपास पर्यंत होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील प्रवाशांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचा प्रयत्न राहिली. वाहतूक पोलीसांसह स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी यांच्याशी समन्वय राखून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी स्वतः जातीने लक्ष देण्याचा प्रयत्न आहे. पर्यायी मार्गदेखील काही असतील त्यासाठी देखील लक्ष दिले जाईल. रस्त्याचे काम सुरु आहे. मात्र काम करीत असताना प्रवाशांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याच्या सुचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. सकाळी वाहतूक कोंडी झाली होती. स्वतः रस्त्यावर उतरून ही कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला. - सरिता चव्हाण, पोलीस निरीक्षक जिल्हा वाहतूक शाखा, रायगड

## एकल मातेचे नाव,जात लावण्यास परवानगी

निरीक्षण नुकतेच उच्च न्यायालयाने नोंदवले. एकल मातेने वाढवलेल्या अल्पवयीन मुलाला तिच्या शाळेच्या नोंदीत आईचे नाव आणि जात बदलण्याची परवानगी देताना उच्च न्यायालयाने नुकतेच हे मत व्यक्त केले.

बलात्कार पीडित मुलीच्या वतीने संबंधित याचिका करण्यात आली होती. मुलीच्या शालेय नोंदींमध्ये तिचे नाव आणि जात मराठावरून अनुसूचित जाती करण्याची मागणी याचिकेत आली होती. प्रकरण सामोपचाराने मिटवल्यानंतर याचिकाकर्तीने मुलाच्या शालेय नोंदींत नाव आणि जात बदलण्याची मागणी केली होती. मागील वर्षी अधिकाऱ्यांनी फेटाळल्यानंतर याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

मुलगा किंवा मुलीची सार्वजनिक ओळख त्यांच्या जन्मदात्या वडिलांपर्यंत मर्यादित असावी हा आग्रह चुकीचा आहे, असे मत न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. हितेन वेणेगावकर यांच्या औरंगाबाद खंडपीठाने व्यक्त करून याचिकाकर्तीला दिलासा दिला. पाल्याच्या सार्वजनिक ओळखीसाठी एकट्या आईला पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे हे दानधर्माचे नाही, तर संविधानिक अधिकार असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने आदेशात नोंदवले. आईचे नाव ओळखपत्रांमध्ये केंद्रस्थानी लावण्याबाबत सरकारने धोरणात्मक मान्यता दिली असताना एका कनिष्ठ अधिकाऱ्याने याचिकाकर्तीची मागणी का नाकारली, अशी विचारणाही न्यायालयाने केली.

ही प्रथा असमानता निर्माण करणारी!

शालेय दस्तऐवज खासगी नोंदी नसून एक सार्वजनिक दस्तऐवज आहे. हा दस्तऐवज वैयक्तिक आणि सार्वजनिक कामांसाठी आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचवेळी पितृत्वाची ओळख ही जातीचा एकमेव मार्ग मानणारी प्रथा असमानता निर्माण करते. या प्रकरणात मूल केवळ आईच्या सामाजिक वातावरणात आणि जातीच्या समुदायात वाढले आहे. त्यामुळे संबंधित शाळा अधिकाऱ्यांनी आईचे नाव आणि जात मुलाच्या शालेय नोंदीत समाविष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

## माथेरानमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह घोटाळा

यांना सभागृह सोडून निघून जावे लागले.

माथेरान शहर हे पर्यटन स्थळ आहे,या पर्यटन स्थळावर येणारे पर्यटक यांना पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पालिका प्रशासनाची असते.पालिका शहरात येणारे पर्यटक यांच्याकडून स्वच्छता कर वसूल करीत असते. त्यामुळे पालिकेला देखील त्या बदल्यात सेवा द्याव्या लागतात आणि त्यासाठी पालिकेकडून माथेरान शहरातील प्रेक्षणीय स्थळे असलेल्या ठिकाणी अशा सुविधा काही प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु माथेरान शहरातील अनेक प्रेक्षणीयस्थळे या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था झालेली आहे. हे लक्षात घेऊन माथेरान नगरपरिषदेकडून प्रेक्षणीय पॉईंट असलेल्या ठिकाणी इको टॉयलेटची संकल्पना राबवण्यासाठी प्रशासक राहुल इंगळे यांनी निर्णय घेतला. यात ३६ ते ३८ लाख रुपयांचा खर्च असलेले स्वच्छतागृह खरेदी करण्याचा निर्णय घेतला आणि नवीन सदस्य मंडळ अस्तित्वात येण्याआधी त्या स्वच्छतागृहांची खरेदी प्रक्रिया पूर्ण केली. शहरात पावसाळा सुरू असताना अशी आठ ई-टॉयलेट आणण्यात आली,मात्र त्यातील एकही टॉयलेट अद्याप कार्यान्वित झालेले नाही. विविध आठ ठिकाणी ही ई- टॉयलेट बसविली जाणार होती आणि त्यातील इको पॉईंट आणि मार्केटमधील वनविभागाचे भूखंड येथे ही ई- टॉयलेट बसवून ठेवले आहे. मात्र त्याचा वापर अद्याप सुरू झालेला नाही. नगरपरिषद कार्यालय, दस्तुरी नाका अशा ठिकाणी ही ई- टॉयलेट शोभेच्या वस्तू सारखी उभ्या आहेत.

बाजारात या ई- टॉयलेटची किंमत साधारण एक लाख पर्यंत आहे. मात्र माथेरान पालिकेने प्रशासक काळात ही ई- टॉयलेट तब्बल ३६ ते ३८ लाखाला एक अशी खरेदी केली आहेत. ही किंमत बघून सर्व चक्रावले असून माथेरान पालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत त्याचे पडसाद उमटले. या ई- टॉयलेटची खरेदी कोणी केली, ठेकेदार कोण आहे, पालिकेकडे तीन कोटेशन कोणती आली, पालिकेने अशा वस्तूंची खरेदी करताना त्यांचा वापर होत असलेल्या ठिकाणी टिकाऊपणा बद्दल खातरजमा केली काय? असे अनेक प्रश्न सर्वसाधारण सभेत सत्ताधारी पक्षाचे गटनेते शिवाजी शिंदे आणि स्वीकृत सदस्य, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी उपस्थित केले. त्यावर प्रशासक म्हणून या ई- टॉयलेटची खरेदी करणारे कोणतेही उत्तर देऊ शकले नाहीत.

या सभेत सचिव म्हणून उपस्थित असलेले मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्यावर आरोपांच्या फेऱ्या झडत असताना शेवटी अध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांची परवानगी घेऊन पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सभागृह सोडण्याचा निर्णय घेतला. यामुळे बाजारात लाखांचा खर्चात मिळणारे ई-टॉयलेटच्या खरेदीसाठी झालेला घोटाळा बाहेर आला नाही.त्याचवेळी असे वारेमाप पैसे लाटणाऱ्या प्रशासक आणि मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडून त्या पैशाची भरपाई करून घावी, अशी मागणी होत आहे. परंतु या वस्तू लाखोंना खरेदी करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांना रायगड जिल्हाधिकारी यांनी खरेदीसाठी परवानगी दिली होती काय? त्यांच्याकडून परवानगी नसेल तर शासन मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करणार काय? असे अनेक प्रश्न समोर येत आहेत.

## गंभीर आजारांवर आता घरपोच उपशामक काळजी सेवा

केंद्र स्तरावर उपलब्ध करून दिली जातील. तसेच घरी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी विशेष होम केअर किट देण्यात येणार असून त्यात ड्रेसिंग साहित्य, आवश्यक औषधे व उपकरणांचा समावेश असेल. जिल्हा रुग्णालयात ४ ते ६ खाटा आणि ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात किमान २ खाटा पॅलिएटिव्ह केअररुग्णांसाठी राखीव ठेवण्यात येतील. तसेच आठवड्यातून एकदा स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग चालविण्यात येणार आहे. कर्करोग, अर्धांगवायू, पार्किन्सन, किडनी व यकृत निकामी होणे, दीर्घकालीन श्वसन विकार, वृद्धापकाळातील अशक्तपणा अशा दुर्धर आजारांचा या कार्यक्रमात समावेश आहे. रुग्णांसोबत त्यांच्या कुटुंबियांना व काळजीवाहूंनाही समुपदेशन व प्रशिक्षण दिले जाणार आहे. रुग्णवाहिका सेवेसह साथ-साथ आणि मानसिक आरोग्यासाठी टेलीमानस या टोल-फ्री क्रमांकांची सुविधा उपलब्ध आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्याच्या सर्व जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना घरबसल्या सन्मानाने व वेदनामुक्त उपचार मिळणार असून, त्यांच्या कुटुंबियांनाही मोठा आधार मिळेल. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व स्वयंसेवी संस्थांना शासनातर्फे दरवर्षी गौरविण्यात येणार आहे.

## प्रतापगड पर्वाने जागविला इतिहास

पोलीस निरीक्षक किशोर साळे, माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, नगरसेवक प्रदीप नाईक, संतोष गुरव, समीर ठाकूर, अनिल चोपडा, ॲड श्वेता पालकर, जमाल सय्यद तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते. विरोधी पक्षनेते संदीप पालकर, जिल्हा परिषद सदस्या आदिती नाईक यांच्यासह विविध मान्यवरांनी उपस्थिती लावली. शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत हेही उपस्थित होते.कार्यक्रमाचे निवेदन अक्षय चंदेल यांनी केले. संगीत सादरीकरणात श्रेयश साळवी व शुभम गरुड (तबला), अनिरुद्ध सराफ (बासरी), हितेश क्षिरसागर (सिंथेसायझर), श्रवण दौंड (पखवाज), धीरज बडे (ढोलकी), गोविंद चौधरी (तालवाद्य), ऋग्वेद वंगारी (ढोल व डफ) यांचा सहभाग होता. कोरस गटात ओम घेबड, शुभम शिंदे, अभिजीत गुरव आणि प्रणव काकडे यांनी साथ दिली.नाट्य सादरीकरणात सुरज इंगवले यांनी शिवाजी महाराजांची भूमिका साकारली, तर ओमकार (बाजी) पांडव यांनी कवीभूषण, अनिल सावंत यांनी अफजल खान/नेतोजी, आणि ऋग्वेद पुंडकर यांनी गोपीनाथ पंत यांच्या भूमिका केल्या. पडद्यामागील कार्य अभिषेक कोळी यांनी सांभाळले. राजवारसा प्रोडक्शन निर्मित या कार्यक्रमासाठी गीतकार संतोष सातपुते यांचे विशेष योगदान होते. सूत्रसंचलन प्रतिम सुतार यांनी केले. प्रतापगड पर्व या कार्यक्रमातून शिवचरित्राचे जिवंत दर्शन घडल्याने उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत झाली असून शिवजयंती उत्सवाला एक वेगळे सांस्कृतिक स्वरूप लाभले. शुक्रवारी सायंकाळी अलिबागमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य अशा सोहळ्याचा आनंद अलिबागकरांनी घेतला.

प्रतापगड पर्व या कार्यक्रमातून अलिबागच्या ऐतिहासीक भूमीत सह्याद्रीचा आत्मविश्वास आणि सागराची विशालता याचा संगम साकारण्यात आला. युवा पिढीला शौर्य, संघटन,शिस्त आणि राष्ट्र प्रेम याची प्रेरणा या कार्यक्रमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ऐतिहासिक विचार आणि मुल्यांचा संवाद साधण्यात आला. प्रतापगड पर्वच्या माध्यमातून महाराजांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजी आंग्रे आणि अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रम पाहण्यासाठी अलिबागकारांसह शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती.

## मुरुडमध्ये घरफोडी करणारा अटकेत

संशयित आरोपीचा शोध घेऊन त्याला १७ फेब्रुवारी रोजी रात्री ९.५४ वाजता ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने घरफोडीची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून सुमारे ३० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन चेन किंमत ४,२०,००० रुपये, सुमारे १५ ग्रॅम वजनाचे दोन डाव व कड्या किंमत २,१०,००० रुपये, सुमारे ३० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या किंमत ४,२०,००० रुपये असा एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे १०,५०,००० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.ही कारवाई पोलीस अधीक्षक रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक तसेच कर्मचारी यांचा समावेश होता. सध्या आरोपीला न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी मिळवण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, घर बंद ठेवून बाहेर जाताना मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-TENDER NOTICE (REFLOAT)

**Tender Specification No.** Civil-III/KGSC Pophali/Rfx No.3000066231, 3000066234, 3000066235, 3000066238, 3000066239, 3000066240, 3000066241, 3000066244, 3000066245, 3000066246, 3000066247/FY-2025-26

**Name of work:**
1) Providing and fixing concrete trench covers, at T.Y., Switchyard, stage III at KGSC, Pophali.
2) Construction of security Chaukies at various locations in Powerhouse premise at KGSC, Pophali.
3) Construction of bituminous road at Pedhambe switchyard, Stage III Power House at KGSC, Pophali.
4) Construction of Box Culvert at stage III switchyard road, at KGSC, Pophali.
5) Upgradation of control room at Stage-III, KGSC, Pophali.
6) Providing, laying Kotah flooring at machine hall, generator floor of St. III, Power house, KGSC Pophali
7) Construction of bituminous internal roads at Pedhambe switchyard stage -III, KGSC, Pophali.
8) Work of raising compound wall at switchyard stage -III, KGSC, Pophali.
9) Construction of new Kitchen otta and toilet units at Sr. bungalow buildings at KGSC, Pophali.
10) Construction of Bituminous approach road to weigh bridge at KGSC, Pophali.
11) Providing wooden badminton court with mat at recreation club building, KGSC, Pophali.

**Sale period :-** 21.02.2026 at 11:00 Hrs. to 08.03.2026 up to17:00 Hrs. | **Submission Date :-** 09.03.2026 up to17:00 Hrs.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :**( 022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगांव, जि. रायगड. जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.१८/०२/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५वा वित्त आयोग/ग्रा.पं. फंड अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/ पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | इसारा फी | निविदा/दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा/दरपत्रक उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चांदेवाडी स्मशानभूमी येथे पाणीसुविधा करणे. | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २५०/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | ३ महिने |
| २ | बोंडशेत बौद्धवाडी स्मशानभूमी येथे पाणीसुविधा करणे. | १५ वा वित्त आयो | २५०००/- | २००/- | २५०/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | ३ महिने |
| ३ | भाले येथे साठवण टाकी क्र.२ पासून जयराम म्हसकर यांचे घरापर्यंत पाईपलाईन बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ७५०००/- | २००/- | ७५०/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | ३ महिने |
| ४ | भाले येथे साठवण टाकी क्र. २ पासून सिताराम कदम यांचे वाडा ते शांताराम मेढेकर यांच्या वाड्यापर्यंत पाईपलाईन बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २९४००/- | २००/- | २९४/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | ३ महिने |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २६/०२/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती / चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य / वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध.) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा. पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. नितीन अर्जून देव मेहता (मो. ८९३९६४३९८३) यांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे विद्यमान मालकांकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे वारे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. गणपत तुकाराम म्हसे | ७१ | २ | ०.३.०० पो.ख.०.०१.०० | ०-०३ |
| | ७२ | २ अ | ०.३३.९० पो.ख. ०.०५.८० | ५-८४ |

सदरच्या जमिन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदूंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २१/०२/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. फ्लॅट नं. ५०४, पाचवा मजला,
गजवक्र रेसिडेन्सी, कचेरी रोड, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे आसल, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णनिलेली जमीन मिळकत आमचे अशील १ मेसर्स किमारा इन एल एल पी तर्फे भागीदार, मीनाक्षी शिवाजी बारकुंड, २. जी. सी. सी. हॉटेल प्रा. ली. तर्फे भागीदार विजय देसराज सैनी यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक मनोहर गुणाजी म्हसे यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**मौजे आसल, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ५३/१ | ०.३५.०० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे ताबेकब्जात आणि भोगवटा सदरी नावे असलेले ०.१७.५० इतके संपूर्ण क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे. | ०.१३ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २१/०२/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत
दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता.माणगांव, जि. रायगड. जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.१८/०२/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५वा वित्त आयोग/ग्रा.पं. फंड अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/ पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | निविदा/दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा/दरपत्रक उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत क्षेत्रात माहितीफलक बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| २ | जावटे प्राथ. शाळा सौरसंच बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ४२२००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ३ | कांदळगाव खुर्द येथे सौरपथदिवे बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ४ | बोंडशेत बौद्धवाडी समाजमंदिराला सौरसंच बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ४०३२०/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ५ | बोंडशेत आदि. वाडी येथे सोलरदिवे बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ६ | बोंडशेत प्रा. शाळा सौरसंच बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ४४८००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ७ | चांदेवाडी प्रा. शाळा सौरसंच बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ४४८००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ८ | जावटे अंगणवाडी प्रा. शाळा सौरसंच बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ४४८००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |
| ९. | ग्रामपंचायत कार्यालयाकरिता सौरउर्जा सुविधा बसविणे | ग्रापं फंड | ५५०००/- | २००/- | २६/०२/२०२६ | २७/०२/२०२६ | १ महिने |

**अटी व शर्ती:-** १) निविदा संबधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २६/०२/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती / चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य / वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार / पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध. ) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता.माणगांव जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. वसिम ए गफुर नजे यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत त्याचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मे. ईलाईट इन्फास्ट्रक्चर तर्फे १) श्री. प्रदिप कुमार चंदूलाल जैन २) श्री. अमृत देविचंद जैन | ८९ | ९/अ/२१ | १-५१-०० | १५१०-०० |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण दान बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. २०/०२/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस शॉप नं. ३८, पहिला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो.८०८७७७०५२५/९०११५००२३५

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.शशिकांत नारायण नागांवकर यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नांदगाव, ता.मुरुड, जि.रायगड. | १००६/२ | ०-५६-५० पो.ख.०-०१-५० एकूण ०-५८-०० | १०.७७ |

सदरहू मिळकतीपैकी श्री. शशिकांत नारायण नागांवकर यांच्या मालकीचे ०-०९-०० हे.आर., आकार १.७२ रु. पै. इतक्या क्षेत्राची मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २०/०२/२०२६.

**ॲड. प्रथमेश प्र. पोतदार**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं.७७६९०८०३३५.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भुमापन क्र. /उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| भायमळा | ६५/२ | ०.५३.२० | १०.२० |

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधीर सखाराम पाटील, मु. भायमळा, हनुमान मंदीराजवळ, कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. सुधीर सखाराम पाटील यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहिवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १९.०२.२०२६

**(ॲड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे बहिरोळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्री. मंदार विनायक वझे, रा. बहिरोळे यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे बहिरोळे, ता. अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २४२, क्षेत्र ०-२९-४० हे. आर + पो.ख. ०-०९-६० हे. आर, एकूण क्षेत्र ०-३९-०० हे. आर, आकार रु. ०.५४ पैसे. पैकी श्री. मंदार विनायक वझे यांच्या अविभक्त हिस्स्याचे क्षेत्र ०-०५-०० हे. आर

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण:- अलिबाग
दिनांक :- २१/०२/२०२६

सही/-
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक प्रज्ञा परशुराम मयेकर रा. श्रीपती टॉवर, बी विंग, तिसरा मजला, तात्या घारपुरे पथ, पिंपळवाडी, मुंबई-४०० ००४ यांच्या नावे असलेली बागायत व घर मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | ३८३ | ०.२६.१० पो.ख.०.०१.३० एकुण ०.२७.४० | १३.५६ |

वर नमुद बागायत मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत चौल घर क्र. २४९४ या घर मिळकतीसह बागायत मिळकत.

सबब सदरहू बागायत व घर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. सदरहु बागायत व घर मिळकतीमध्ये अन्य याउपरही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे. असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- २०/०२/२०२६

**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड व
रा.थेरोंडा, धाकलीवाडी, पो.चौल
ता.अलिबाग, जि.रायगड

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सचिन दामोदर मगर, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १५०५ | ०-९३-४० पो.ख. ०-०४-८० एकुण ०-९८-२० | ३१.९८ |

वर नमुद जमिन मिळकतीपैकी खाते क्र. ४९१४ श्री. सचिन दामोदर मगर यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-१५-६० हे.आर., पो. ख ०-००-८० हे. आर. एकुण क्षेत्र ०-१६-४० हे.आर., आकार ५.३४ रु. पैसे, या मिळकतींबाबतचे.

दिनांक २१/०२/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेल्या मिळकती आमचे अशिल श्री. बबन बामा पाटील यांनी त्या मिळकतीचे मालक १. श्री. उल्हास मधुकर रांजणे, २. श्री. राजेंद्र शांताराम चंबावणे, ३. श्री. मयुर भास्कर खंडागळे यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे उचले, ता. मुरबाड, जि. ठाणे**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर पॉ | आकार रू. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४६४ | १.४२.०० | १.०६ | १. श्री. उल्हास मधुकर रांजणे<br>२. श्री. राजेंद्र शांताराम चंबावणे |
| ४६० | ०.२४.०० | ०.६६ | श्री. मयुर भास्कर खंडागळे |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतींबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी- हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - २१-०२-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे**
बी. एल. एस. एल. एल. बी.
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४/९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, शारदा मारूती तांडेल व इतर ३ मु.पो.कासु, ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी जांभोशी ता.पेण, जि.रायगड येथे असून मी स्वतः संध्या विलास पाटील रा. कुकशेत गाव, फ्लॅट नं. ९६ सेक्टर १४ सारसोले डेपो नेरूळ पश्चिम नवी मुंबई येथील रहिवासी असून मी खालील वर्णनाची जमिन विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| जांभोशी | शारदा मारुती तांडेल व इतर ३ | २९ ब | ०.०४.०० | ३.५० |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वतः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक २१/०२/२०२६

**संध्या विलास पाटील**
कुकशेत गाव, फ्लॅट नं.९६,
सेक्टर १४ सारसोले डेपो,
नेरूळ पश्चिम, नवी मुंबई
फोन नंबर ९७६९६५२१५१

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **पाहिजेत**–अलिबाग येथे ऑफीसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ऑफीस असिस्टंट पाहिजे. संपर्क– श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- **हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत.** १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४)X-Rayसाठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- **मंगलग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ,** अलिबाग येथे Packing व डिलेवरी व इतर कामासाठी मुल, मुली पाहिजेत. संपर्क :– ७८७५९९००९२
- **शर्वरी एंटरप्रायजेस चेंढरे–अलिबाग येथे सोलर**/इलेक्ट्रिकल दुकानात काम करण्यासाठी बारावी पास मुलगा पाहिजे. BA/BCom शिक्षण घेत असलेला सुद्धा चालेल. संपर्क : ७७५५९३२२२९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

## PUBLIC NOTICE

### OFFICE OF THE ARBITRATOR

**Preliminary Town Planning Scheme NAINA, No. 11**

**(At part villages of Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon)**

(under Section 72(7) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)
(read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)
NO. ARB/TPS-11/Award/2025/1218

WHEREAS, the Draft Town Planning Scheme NAINA, No. 11 At part of villages of Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub-section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') vide Notification No. CIDCO/ NAINA/TPS-11/2024/115; dated 18th July 2024, in exercise of the powers delegated to him by the Urban Development Department vide its Notification No.TPS-1817/973/C-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 19th July 2024.

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri Pradip Gohil, retired Joint Director of Town Planning, as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No. TPS-1224/1343/C.R.78/24/TPS-11/UD-12 Dated 14th August 2024, which was published in Maharashtra Government Gazette Part – I dated 10-16th October 2024 under sub-section (1) of Section 72 of the said Act.

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No. 13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared under his notice dated 8th October 2024 published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 11th October 2024 that he has commenced the duties as Arbitrator in respect of the Town Planning Scheme NAINA, No. 11 At part villages of Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon with effect from 8th October 2024.

And whereas, the special notices in the prescribed form No. 4 have been served to each and every owner of the lands included in the said scheme & their hearings with recording minutes thereof in this respect have been completed.

And whereas, the Town Planning Scheme NAINA, No. 11 At part villages of Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon has been sub-divided by the Arbitrator into Preliminary Scheme & Final Scheme on 27th October 2025 as provided under sub-section (3) of section 72 of the said Act.

And whereas, the Arbitrator has followed the procedure, prescribed in Rule No. 13 of the said Rules, and has carried out the duties laid down in sub-section (4) of section 72 of the said Act.

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Preliminary Town Planning Scheme NAINA, No. 11 At part villages of Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon has been drawn up by him on 17th November, 2025 as provided under sub-section (7) of Section 72 of the said Act read with rule 13 (9) of the said Rules.

The Preliminary Scheme so drawn up by the undersigned has been published and copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the office of the Arbitrator and of the Special Planning authority, NAINA, at 7th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai-400614.

**Place :** NAINA Office ,
7th Floor, Tower No. 10,
CBD-Belapur, Navi Mumbai, 400614
**Date :** 17th November, 2025.

**Pradip Gohil,**
**Arbitrator,**
Town Planning Scheme NAINA, No. 11.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

## जाहीर सूचना

### लवाद यांचे कार्यालय

**प्राथमिक नगर रचना परियोजना नैना, क्र. ११,**

**(डेरवली(भाग), पळस्पे(भाग), कुडावे(भाग), नांदगाव(भाग), वडवली(भाग), तुरमाळे(भाग) आणि शिरढोण(भाग))**

(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) सहित
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)
लवाद/नरयो-११/ नैना / निवाडा/२०२५/१२१८

ज्याअर्थी, प्रारुप नगर रचना परियोजना नैना, क्र. ११, (मौजे डेरवली(भाग), पळस्पे(भाग), कुडावे(भाग), नांदगाव(भाग), वडवली(भाग), तुरमाळे(भाग) आणि शिरढोण(भाग)) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३/०९/२०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र.सिडको /नैना /न.र.यो.११ /प्रा.यो. /२०२४/ ११५ दिनांक १८ जुलै २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-२ मध्ये दिनांक १९ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने श्री. प्रदिप गोहील, निवृत्त सह-संचालक नगररचना यांची नेमणूक उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (१) प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र.टीपीएस-१२२४/१३४३/प्र.क्र.७८/२४/न.र.यो-११/नवि-१२, दिनांक १४ ऑगस्ट २०२४ अन्वये केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १ मध्ये दिनांक १०-१६ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग-२ मध्ये दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी सुचना प्रसिद्ध करुन नगर रचना परियोजना नैना, क्र. ११, (मौजे डेरवली(भाग), पळस्पे(भाग), कुडावे(भाग), नांदगाव(भाग), वडवली(भाग), तुरमाळे(भाग) आणि शिरढोण(भाग)) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगर रचना परीयोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत.

आणि ज्या अर्थी नगर रचना परियोजना नैना, क्र. ११, (मौजे डेरवली(भाग), पळस्पे(भाग), कुडावे(भाग), नांदगाव(भाग), वडवली(भाग), तुरमाळे(भाग) आणि शिरढोण(भाग)) हीची उक्त अधिनियमांच्या पोटकलम (३) कलम ७२ अन्वये दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राथमिक योजना व अंतिम योजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त नियमांमधील नियम क्र.१३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (४) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार नगर रचना परियोजना नैना, क्र. ११, (मौजे डेरवली(भाग), पळस्पे(भाग), कुडावे(भाग), नांदगाव(भाग), वडवली(भाग), तुरमाळे(भाग) आणि शिरढोण(भाग)) या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियमांचा नियम क्र.१३ (९) प्रमाणे ही परियोजना दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही प्राथमिक परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्या कडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमीनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४ येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**पत्ता-:** नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,
सी.बी.डी. बेलापूर- नवी मुंबई ४०० ६१४
**दिनांक:** १७ नोव्हेंबर, २०२५

**(प्रदिप गोहिल)**
**लवाद,**
**नगर रचना परियोजना नैना, क्र. ११**

**सिडको/जनसंपर्क/५०९/२०२५-२६**




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक लाभ होतील. अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामं मार्गी लागतील. सुखी-समाधानी रहाल.
- **वृषभ** : कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कौटुंबिक सौख्य लाभेल. तुमचे अंदाज अचूक ठरू शकतील.
- **मिथुन** : मनासारख्या घटना घडतील. स्थावर बाबतीत अनुकूलता वाढेल. जुनी येणी सहज वसुल होतील.
- **कर्क** : हितशत्रूंवर विजय मिळवाल. योजलेली कामं पूर्ण होतील. उपजत कला-गुणांना पुरेसा वाव मिळेल.
- **सिंह** : थोरामोठ्यांच्या मार्गदर्शनाने अपेक्षित प्रगती होईल. गुंतवणुकीतून चांगला लाभ होईल. चिंता नसावी.
- **कन्या** : संततीबाबत चिंता संभवते. कामाचं नियोजन करुन निर्णय घ्यावं. महत्त्वाच्या घटना घडतील.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग निघेल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. गृहसौख्य लाभेल. सुसंधीचा लाभ घ्यावा.
- **वृश्चिक** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्य राखा. प्रियजनांच्या भेटी होतील.
- **धनु** : योजलेली कामं पूर्ण होतील. मित्रांचं उत्तम सहकार्य लाभेल. आर्थिक प्रगती मनासारखी होईल.
- **मकर** : कौटुंबिक जीवनात कटुता टाळावी. नव्या योजना मार्गी लावता येतील. अपेक्षित घटना संभवतात.
- **कुंभ** : कौटुंबिक तणाव टाळावे. हाती घेतलेल्या कामात प्रगती होईल. आर्थिक अडचणी कमी होतील.
- **मीन** : नोकरी-व्यवसायात अपेक्षित प्रगती साधता येईल. आर्थिक बाबतीत चांगला दिवस आहे.

स्टाईल स्टेटमेंट

## दुपट्टा फॉर एव्हरी ऑकेजन

✻ साधेपणा जपणाऱ्या तरुणी टस्सल वर्कवाला दुपट्टा घेऊ शकतात. मेहंदी, संगीत अशा सोहळ्यांसाठी हा दुपट्टा बेस्ट आहे.

✻ दुपट्टे असो किंवा ब्लाउज, छानशी लटकन त्यांची शोभा वाढवते. लग्नातल्या सोहळ्यांसाठी नाजूक साजूक गोटा लटकनवाले दुपट्टे घ्या.

✻ गोटा पत्तीचं डिझाइनही हिट आहे. लग्नासारख्या शुभ प्रसंगी असे दुपट्टे खूप छान दिसतात.

✻ स्कॅलप्ड बॉर्डर दुपट्ट्यांची खूप चलती आहे. लग्नातल्या पेहरावांमध्ये अशा दुपट्ट्यांना वेगळंच स्थान आहे. त्यामुळे तुम्ही असे दुपट्टे घेऊ शकता. यात दुपट्ट्याच्या बॉर्डरला वेगळ्या डिझाइनची झालर किंवा लेस लावली जाते. या प्रकाराला स्कॅलप्ड बॉर्डर म्हणतात.

✻ हेवी फ्लोरल बॉर्डरवाला दुपट्टा नववधूची शान वाढवतो.

✻ यासोबतच लेस वर्क, मल्टी शेड, फ्रिंज, स्टोन वर्क, दुपट्टा विथ बेल्ट हे प्रकारही इन आहेत.

## २१ फेब्रुवारी

दिनविशेष

**१९९९** : पन्नास वर्षांपासून बंद पडलेली दिल्ली-लाहोर बससेवा सुरू झाली.

**२०१३** : शक्तिशाली बॉंबस्फोटांच्या मालिकेने हैदराबाद हादरले. दिलसुखनगरमध्ये ३ स्फोट. २० जण ठार तर ८० जखमी. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता. मुंबईसह राज्यात हाय अॅलर्ट.

**२०१८** : पीएनबी गैरव्यवहारातील मुख्य आरोपी नीरव मोदीची अलिबागमधील मालमत्ता सीबीआयकडून जप्त.

स्मार्ट टिप्स

## बनावट की अस्सल?

'अँड्रॉइड' असो किंवा 'आयओएस' अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्समध्ये बनावट म्हणजे फेक ॲप्सचा सुळसुळाट आहे. आपण डाउनलोड करत असलेलं कोणतं ॲप बनावट आहे हे कसं ओळखायचं हे जाणून घेऊ या.

✻ कोणतंही ॲप डाउनलोड करून घेण्याआधी त्याचा स्रोत म्हणजे सोर्स तपासून पाहा. अधिकृत वेबसाईटवरूनच ॲप्स डाउनलोड करा. गुगल किंवा ॲपल प्ले स्टोअरमधूनच ॲप्स डाउनलोड करा. ती व्हेरिफाईड आहेत की नाही याची खात्री करून घ्या.

✻ ॲपल तसंच गुगल प्ले स्टोअरवर ॲप्सबाबत दिलेले रिव्ह्यू आधी वाचून घ्या. बरेचदा नको असलेली ॲप्सही आपण डाउनलोड करत असतो. यामुळे आपला फोन स्लो होतो. अशा ॲप्सचे काहीच लाभ होत नाहीत. तसंच बनावट ॲप्समध्ये काही चुका नक्कीच आढळतील.

✻ खऱ्या ॲपच्या डेव्हलपरची माहिती दिलेली असते. या डेव्हलपरची माहिती सोशल मीडिया किंवा वेबसाईटवर मिळू शकते. ॲपच्या डेव्हलपरची माहिती मिळत नसेल तर ते ॲप बनावट आहे असं समजावं.

### पंचांग

**शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
फाल्गुन शु. ४, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : रेवती, योग : शुभ,
सूर्योदय ७.०६, सूर्यास्त ६.३९

### फॉरवर्डस

**ये जिंदगी है जनाब,**

**जीना सिखाये बगैर मरने नही देती...!**

आरोग्यमंत्र

## ...म्हणून लसूण खावा

लसणाचे सेवन आरोग्यवर्धक समजले जाते. लसणाच्या सेवनाने अनेक त्रास, आरोग्यसमस्या दूर होतात. जसे की, श्वास मोकळा होण्यासाठी एक लसूण पाकळी गरम करून किंचित मीठ लावून खावी. दमा कमी होण्यासाठी एक पेला गरम पाण्यात दोन चमचे मध आणि १० थेंब लसूण रस घ्यावा. झोपण्यापूर्वी तीन लसूण पाकळ्या दुधात उकळून घेतल्याने रात्री दम्याचा त्रास देत नाही.

✻ न्यूमोनिया नाहीसा होण्यासाठी एक लिटर पाण्यात एक ग्रॅम लसूण आणि २५० मि.ली. दूध घालून उकळवावे. पाव हिस्सा करावे. हे दूध दिवसातून तीन वेळा घ्यावे.



✻ क्षयरोगावर इलाज म्हणून लसूण दुधात उकळून घ्यावे, असे आयुर्वेदात सांगितले आहे. लसूण पौष्टिक, वीर्यवर्धक, उष्ण, पाचक, मलनिस्सारक आहे. मुरुमे आणि मोड्या (पिंपल्स) कमी होण्यासाठी लसूण नियमितपणे चेहऱ्यावर चोळावा. नायटा, इसब आदी त्रास असेक तर त्वचेवर लसूण चोळल्याने रोग बरा होतो.

✻ रक्तवाहिन्यांवरील दाब, ताण कमी झाल्यास नाडीचे आणि हृदयाचे ठोके कमी पडतात. अशावेळी लसणाचे सहा थेंब चार चमचे पाण्यातून दोन वेळा घेतल्याने उच्च रक्तदाब नियंत्रित राहतो. वाढलेला रक्त दाब कमी होण्यासाठी लसूण, पुदिना, जिरे, धने, काळी मिरी आणि सैंधव मिठाच्या चटणीचे सेवन करावे. त्यानेही रक्तदाव नियंत्रित राहतो.

### फॅशन पॅशन

✻ इंटरव्ह्यूला जाताना भलतंसलतं काहीही घालू नका. काही तरी भन्नाट करण्याच्या नादात आपण आपलं महत्त्व कमी करतो. लोक तुम्हाला गांभीर्याने घेत नाहीत. बो टाय, बेडॅझल्ड तसंच मेटॅलिक टाय, पेस्टल किंवा निळ्या रंगाचे सूट असलं काहीही घालू नका.

✻ चांगली पँट सापडली नाही तर मुलं पटकन जीन्स निवडतात. त्यातही फॉर्मल पँटसारखी वाटणारी ब्लॅक जीन्स घातली जाते. पण असं काही करू नका. जीन्स हा कॅज्युअल पेहराव आहे. इंटरव्ह्यूला जीन्स घालून जाणं ही खूप मोठी चूक ठरेल. (क्रमश:)

समुपदेशन

## दुरावा दूर करावा

तीन वर्षांपूर्वी एका मुलाची भेट झाली. त्यावेळी माझं नुकतंच ब्रेक अप झालं होतं. या धक्क्यातून सावरण्यासाठी या मुलाशी मैत्री केली. तो खूप चांगला आहे. पण भावना व्यक्त करत नाही. या नात्याबद्दल काय वाटतं हे सांगत नाही. प्रत्येक परिस्थिती नीट हाताळतो. पण कशावरही प्रतिक्रिया देत नाही. यामुळे खूप अस्वस्थ होते. या नात्यात रस उरला नाही. मध्यंतरी ऑफिसमधल्या एका मुलाशी ओळख झाली. मला तो आवडतो. त्याला माझ्याबद्दल आणि या मित्राबद्दल माहीत आहे. या पार्श्वभूमीवर मी कोणत्या मित्राकडे भविष्यातला साथीदार म्हणून पाहू?



- तुमच्या दोघांमधला संवाद खुंटला आहे. यामुळे दुरावा निर्माण झाला आहे. तुझा हा मित्र प्रत्येक परिस्थिती सहज हाताळू शकतो. पण प्रत्येक वेळी इतकं सक्षम होण्याची गरज नाही, याची जाणीव त्याला दे. त्याने तुझ्याशी साधासरळ व्यवहार करावा, तुझ्या काही गोष्टी खटकल्या तर त्याची जाणीव करून द्यावी या अपेक्षा त्याला सांग. कदाचित त्याला तुला त्रास द्यायचा नसेल. मनावर ताण यावा, असं वागायचं नसेल. पूर्वी त्याने भावना कोणाकडे व्यक्त केल्या असतील. पण म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसेल. त्यामुळे तो जपून पावलं टाकत असेल. सध्याच्या नकारात्मक परिस्थितीमुळे तुला ऑफिसमधला नवा मित्र भावत असावा. म्हणून तू मूळ मित्राशी संबंध सुधारलेस तर नव्या नात्यात रस वाटणार नाही.

खेचाखेची

## वयाच्या मानाने

'छान दिसता हो तुम्ही',
हे ऐकून होणाऱ्या आनंदावर
विरजण घालणारे २ शब्द...
.
.
.
.
.
.
.
वयाच्या मनाने!

वेगळं काही

फिलिपाईन्समधल्या 'उबे' बेटाची तऱ्हाच निराळी. भरतीच्या वेळी समुद्राचं पाणी इथल्या घरांमध्ये शिरतं. वर्षातल्या ३६५ पैकी १३० दिवस इथे हीच परिस्थिती असते. असं असूनही स्थानिकांना हे बेट सोडून कुठेही जायचं नाही. यामागचं कारण म्हणजे इथे असलेली प्रचंड शांतता. इथली एक रहिवासी मारिया सावेद्राला कोणताही ताण नाही. घरात पाणी शिरल्यानंतरही ती इथे अगदी आरामात राहू शकते. मला हे बेट खूप आवडतं. इथे खूप शांतता आहे. त्यामुळे दररोज जवळपास चार तास मोठी भरती येत असली तरी हे ठिकाण सोडून जावंसं वाटत नाही. इथले बहुसंख्य लोक मासेमारी करून उदरनिर्वाह करतात. **(क्रमश:)**

व्हा टेक सॅव्ही

## ठावठिकाणा कळू नये म्हणून...

सध्याच्या स्मार्टफोनच्या जमान्यात या तंत्रज्ञानाचे विविध लाभ दिसून येत आहेत. खरं तर स्मार्टफोनचं तुमच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष असतं. यातल्या लोकेशन फीचरमुळे तुमचा ठावठिकाणा कळतो. फोनमधली बरीच ॲप्स तुमचं 'रिअल टाईम लोकेशन' टिपत असतात. फोनमधलं लोकेशन ऑन ठेवल्याने 'गुगल मॅप' किंवा इतर सुविधा वापरता येत असल्या तरी आपली माहिती इतरांपर्यंत पोहोचू नये असं वाटत असेल तर 'लोकेशन फीचर' ऑफ करू शकता.



अँड्रॉइड फोनवर 'लोकेशन ऑफ' करण्यासाठी 'फोन सेटिंग्ज'मध्ये जाऊन गुगलवर टॅप करा. नंतर 'गुगल अकाउंट' मध्ये जा. 'डेटा अँड पर्सनलायजेशन' पर्याय निवडा. नंतर 'लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून 'स्वीच ऑफ' करा. या 'लोकेशन हिस्ट्री'खाली दिलेल्या 'डिलिट लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून हिस्ट्री डिलिट करून टाका. 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करण्यासाठी कॉम्प्युटरच्या 'ॲक्टिव्हिटी कंट्रोल' पेजवर जा. गुगल अकाउंटमध्ये लॉग इन करावं लागेल. इथून 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करता येईल. काही ॲप्स लोकेशनच्या परवानगीशिवाय नीट काम करत नाहीत. अशाच ॲप्सना लोकेशनची परवानगी द्या. सर्व ॲप्सना परवानगीची गरज नाही.

## सुडोकू ६७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | १ | | | ३ | ७ | | ४ |
| २ | ३ | ६ | | ७ | | | | ५ |
| ५ | | ७ | | १ | | | | |
| | | | १ | | | ३ | | २ |
| | | ३ | २ | ५ | ८ | ४ | | |
| १ | | ४ | | | ७ | | | |
| | | | | ९ | | ८ | | १ |
| ४ | | | | ८ | | ६ | ५ | ७ |
| ८ | | ५ | ४ | | | २ | ९ | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६६चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ८ | २ | १ | ९ | ७ | ५ | ४ |
| ४ | ९ | १ | ८ | ५ | ७ | ६ | २ | ३ |
| २ | ५ | ७ | ६ | ३ | ४ | १ | ८ | ९ |
| ९ | ७ | ३ | १ | ६ | २ | ५ | ४ | ८ |
| ८ | ६ | ४ | ७ | ९ | ५ | २ | ३ | १ |
| ५ | १ | २ | ४ | ८ | ३ | ९ | ६ | ७ |
| ३ | २ | ६ | ९ | ७ | ८ | ४ | १ | ५ |
| ७ | ४ | ५ | ३ | २ | १ | ८ | ९ | ६ |
| १ | ८ | ९ | ५ | ४ | ६ | ३ | ७ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ६७

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | ५ | | ६ | | ■ | ७ | | ८ | ९ |
| ■ | १० | | | ■ | ■ | | ■ | | ■ | ११ | | ■ | १२ | |
| ■ | | ■ | १३ | १४ | १५ | ■ | १६ | | १७ | | ■ | १८ | | ■ |
| १९ | | २० | ■ | २१ | | | | ■ | २२ | | २३ | ■ | २४ | २५ |
| ■ | २६ | | २७ | | | ■ | २८ | २९ | | ■ | ३० | ३१ | | |
| ३२ | | ■ | | ■ | | ■ | ३३ | | ■ | ३४ | ■ | ३५ | | ■ |
| | ■ | ३६ | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | | ३९ | | ■ | ४० |
| ४१ | ४२ | ■ | | ■ | | ■ | ■ | ४३ | | | | ■ | ४४ | |
| ४५ | | ■ | ■ | ४६ | | ४७ | ४८ | | | ■ | ४९ | ५० | | |
| ५१ | | ५२ | ■ | | ■ | ५३ | | | ■ | ५४ | ■ | ५५ | | ■ |
| ५६ | | | ५७ | | ■ | | ■ | ५८ | ५९ | | ■ | | ■ | ६० |
| ■ | ■ | ६१ | | ■ | ६२ | | ■ | ■ | ६३ | | ■ | ६४ | ६५ | |
| ६६ | | | | ■ | ६७ | | ६८ | | | ■ | ६९ | ■ | ७० | |
| | ■ | | ■ | ७१ | | ■ | | ■ | ७२ | | | ७३ | ■ | ■ |
| ७४ | | | ■ | ७५ | | | | ■ | | ■ | ७६ | | | |

**आडवे शब्द :-**

१) ------ विघ्नविनाशक मोरया, संकटी रक्षी शरण तुला मी गणपतीबाप्पा मोरया एक गणेश गीत
७) गायीचे ओरडणे
१०) डोंगराचा कोसळणारा भाग
११) कंकर, बारीक दगड
१२) वाळा
१३) खबदाड
१६) फळांचे पेय
१८) मत्सर
१९) मनुष्य
२१) नवरा
२२) धाक, वचक
२४) सत्ता
२६) झोबणारे, खरबरीत
२८) दहाचा समुह
३०) सज्जनगड पावन करणारे संत
३२) चाक
३३) नाडी, धमनी
३५) मगज
३६) सारखा
३७) नकारच्या विरुद्ध
३८) मेंढपाळ
४१) व्यापारातील फायदा
४३) कारखान्यातील मजूर
४४) जिवलग मित्र
४५) नवरदेव
४६) मालाचे येणे-जाण
४९) भ्रमर
५१) अर्धांगवायू
५३) आपला नसलेला
५५) द्रव, आवड, रुची
५६) नम्रतेने मान खाली घालणे
५८) देश (हिं.)
६१) होडी
६२) मनाचा ओढा
६३) हिमालयातील एक प्राणी
६४) पत्र, डाक
६६) उद्यान
६७) सत्तेवर असणारा
७०) रोखलेली नजर
७१) जरच्या बरोबरचा शब्द
७२) एक सुगंधी फूल
७४) दगडाचा एक प्रकार
७५) मत देणारा
७६) धकधक, छातीतील ठोक्यांचा आवाज

**उभे शब्द :-**

२) श्रीकृष्णाच्या बोटातील फिरते आयुध
३) कोळशाची पूड
४) मऊच्या विरुद्ध
५) खेद
६) उपस्थित
७) मोठ्या तोंडाचे मोठे भांडे
८) पहारेकरी
९) मच्छर
११) धोका (हिं.)
१४) गावठी आंब्याची एक जात
१५) पंचवीसाव्या वर्धापन वर्षाचा उत्सव
१६) कायदेशीर
१७) पाणकोंबडा
२०) उर्ध्व दिशा
२३) थोडक्यात राजमान्य राजेश्री
२५) गंध
२७) छोटी लढाई
२९) बाण
३१) सुसर
३२) हालचाल
३४) पानाला पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली भाकरी
३८) हिंमत, धैर्य
३९) उष्ण
४०) माल साठविण्याची जागा
४२) काडीमोड
४३) कावळ्यांचे ओरडणे
४४) कसदार
४६) आणखी
४७) कापडचोपड
४८) यार, समुद्रकाठचा फेस
५०) धुराने भरलेले
५२) श्रीविष्णूचे बुटके रूप
५४) तबकडी
५७) स्तुतीची गाणी
५९) पूर्ण तयारी करून
६०) धनी
६२) व्यायाम
६५) पाण्याचा प्रवाह, फळी
६६) प्रकाश
६८) निषेध
६९) सुवास
७१) अंधार.
७३) मस्तकाखालचे शरीर, व्यवस्थित

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | ख | क | र्ता | दु: | ख | ह | र्ता | वा | र्ता | वि | घ्ना | ची | ■ | को |
| भा | र | त | ■ | ख | ड | क | ■ | न्या | ■ | घ्न | ■ | ज | व | स |
| ष | ■ | र | म्य | ■ | का | ■ | श | शी | ■ | ■ | सा | व | ■ | रा |
| चं | ■ | ण | ■ | को | ळ | सा | ■ | भां | ग | डा | ■ | स्तू | प | ■ |
| द्र | व्य | ■ | पो | य | ■ | ग | रु | ड | ■ | मा | त्र | ■ | सा | य |
| बो | ■ | प | ■ | ता | ठ | र | ■ | णे | ■ | डु | ■ | गु | ■ | क्ष |
| स | मो | र | ■ | ■ | ण | ■ | क | ■ | अ | ल | भ्य | ला | भ | ■ |
| ■ | ■ | का | ठो | का | ठ | ■ | स | क | ल | ■ | ■ | ब | र | का |
| त | न | या | ■ | स | ण | वा | र | ■ | ग | रा | ■ | ■ | ड | र |
| मा | वा | ■ | स | ■ | पा | ट | ■ | खे | द | ज | न | क | ■ | खा |
| स | ■ | सं | ध्या | का | ळ | ■ | हा | ट | ■ | ■ | र | म | जा | न |
| गी | ■ | ता | ■ | या | ■ | ख | त | र | ना | क | ■ | र | ■ | दा |
| र | ज | प | ज | ■ | वा | स | रु | ■ | म | रा | त | ब | ■ | र |
| ■ | मी | ■ | न | क्ष | त्र | ■ | मा | ला | मा | ल | ■ | स्ता | ■ | ■ |
| मा | न | व | ता | ■ | ट | पा | ल | ■ | त्र | ■ | गो | ■ | दू | र्वा |


# कलासक्त

## ‘केनेडी’सह बडे चित्रपट ओटीटीवर



१ चित्रपटगृहानंतर आता प्रेक्षकांचे लक्ष ओटीटी प्लॅटफॉर्मकडे वळले आहे. येत्या शुक्रवारी नेटफ्लिक्स, झी५ आणि जिओ–हॉटस्टार यांसारख्या प्लॅटफॉर्मवर अनेक बहुप्रतिक्षित चित्रपट आणि वेब सीरिज प्रदर्शित होत आहेत. यामध्ये अनुराग कश्यप यांच्या केनेडी पासून ते साऊथच्या गाजलेल्या सिनेमांपर्यंत मोठा खजिना उपलब्ध होणार आहे. जागतिक चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुक झालेला दिग्दर्शक अनुराग कश्यप यांचा केनेडी हा चित्रपट अखेर २० फेब्रुवारीला डिजिटल प्लॅटफॉर्मवर येत आहे. राहुल भट्ट आणि सनी लिओनी यांची मुख्य भूमिका असलेला हा एक निओ–नॉयर क्राईम थ्रिलर आहे. एका माजी पोलिसाची कथा असलेल्या या चित्रपटाची प्रेक्षक बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा करत होते. हा चित्रपट झी५ आणि नेटफ्लिक्सवर उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तमिळ आणि कानडी चित्रपटसृष्टीतील काही महत्त्वाचे चित्रपटही याच दिवशी स्ट्रीम होणार आहेत. जी. व्ही. प्रकाश कुमार आणि अनस्वरा राजन यांचा लकी द सुपरस्टार हा तमिळ कॉमेडी–ड्रामा चित्रपट जिओ–हॉटस्टारवर प्रदर्शित होत आहे. तसेच, कानडी चित्रपटसृष्टीतील डायनॅमिक प्रिन्स विजय राघवेंद्र याचा राक्षस हा सायकोलॉजिकल क्राईम थ्रिलर झी५ वर प्रेक्षकांसाठी खुला होईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर, नेटफ्लिक्सवर स्ट्रिप लॉ ही नवीन ॲनिमेटेड कॉमेडी मालिका प्रदर्शित होत आहे, तर ॲपल टीव्ही प्लसवर द लास्ट थिंग ही टोल्ड मी या प्रसिद्ध मालिकेचा दुसरा सीझन याच दिवशी भेटीला येईल.

## फेब्रुवारीअखेर बिग फाईट




फेब्रुवारी महिन्याचा उत्तरार्ध चित्रपट शौकिनांसाठी मेजवानी ठरणार आहे. येत्या शुक्रवारी, रोजी बॉलिवूडमधील अनेक मोठे चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित होत असून बॉक्स ऑफिसवर जोरदार टक्कर पाहायला मिळणार आहे. यामध्ये सामाजिक विषयांवरील चित्रपटांपासून ते रोमँटिक ड्रामापर्यंतच्या विविध कथांचा सम ावेश आहे. या आठवड्यातील सर्वात चर्चेत असलेला चित्रपट म्हणजे ‘अस्सी’. अनुभव सिन्हा यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटात तापसी पन्नू आणि झीशान अयुब मुख्य भूमिकेत आहेत. वाराणसीच्या पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट एका गंभीर सामाजिक मुद्द्यावर भाष्य करतो. दुसरीकडे, तरुण प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी ‘दो दीवाने शहर में’ हा चित्रपट सज्ज आहे. संजय लीला भन्साळी यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी आणि मृणाल ठाकूर यांची नवी जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळेल. रवी उदयावर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, एका आधुनिक प्रेमकाव्याचा अनुभव यात मिळणार आहे. अजय देवगणचे निवेदन लाभलेला आणि वीर कपूर यांची निर्मिती असलेला ‘शतक’ हा चित्रपटही २० फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट एका मोठ्या संस्थेच्या १०० वर्षांच्या प्रवासावर प्रकाश टाकणार असल्याने याची सर्वत्र उत्सुकता आहे. ऐतिहासिक चित्रपटांची आवड असलेल्या मराठी प्रेक्षकांसाठी ‘वीर मुरारबाजी’ हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. म ुरारबाजी देशपांडे यांच्या पराक्रम ाची गाथा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर मांडली जाणार आहे.



## ‘ओ रोमिओ’ला सुगीचे दिवस



फेब्रुवारी महिन्याचा दुसरा आठवड्यात सनी देओलच्या ऐतिहासिक यश मिळवलेल्या बॉर्डर २या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपले वर्चस्व कायम राखले आहे, तर दुसरीकडे व्हॅलेंटाईन डेच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या ओ रोमिओया चित्रपटाने तरुणाईला चित्रपटगृहांकडे खेचण्यात यश मिळवले आहे. गेल्या महिन्यात प्रदर्शित झालेल्या ‘बॉर्डर २’ या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ३५२.३२ कोटींचा गल्ला जमवला असून, जागतिक स्तरावर या चित्रपटाने ५०० कोटींचा टप्पा ओलांडण्याच्या दिशेने कूच केली आहे. ‘गदर २’ नंतर सनी देओलचा हा सलग दुसरा मोठा ब्लॉकबस्टर ठरला आहे. दुसरीकडे, १३ फेब्रुवारीला प्रदर्शित झालेल्या ‘ओ रोमिओ’ या चित्रपटाने पहिल्या चार दिवसांत ३९.२६ कोटींची दमदार कमाई केली आहे. शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी यांची मुख्य भूमिका असलेल्या या रोमँटिक ड्रामाला व्हॅलेंटाईन डेचा मोठा फायदा झाला. मात्र, याच काळात प्रदर्शित झालेल्या ‘तू या मैं’ या चित्रपटाला प्रेक्षकांनी साफ नाकारले असून, या चित्रपटाला केवळ ३.२ कोटीं वर समाधान मानावे लागले आहे. मराठी सिनेसृष्टीत दिग्दर्शक केदार शिंदे यांचा ‘अगा अगा सूनबाई...’ हा चित्रपट महिला वर्गात लोकप्रिय ठरला असून ९.६० कोटींचा टप्पा पार केला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या ‘रणपती शिवराय – स्वारी आग्रा’ या चित्रपटाने दुसऱ्या आठवड्यात १.०७ कोटींची कमाई करत संथ पण स्थिर गती राखली आहे.

## खलनायकही अन् प्रेमळ पिताही!

मराठी छोट्या पडद्यावरील दोन अत्यंत लोकप्रिय मालिकांमध्ये दोन भिन्न टोकाच्या भूमिका साकारून अभिनेता मयूर खांडगे सध्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. ठरलं तर मग या मालिकेत तो महिपत शिखरे हा प्रभावी खलनायक साकारत आहे, तर दुसरीकडे सावळ्याची जणू सावली या मालिकेत तो जगन्नाथ ही सकारात्मक आणि संवेदनशील वडिलांची भूमिका साठावत आहे. एकाच वेळी क्रूर खलनायक आणि तितकाच प्रेमळ पिता अशा दोन परस्परविरोधी भूमिका साकारणे आव्हानात्मक असल्याचे मयूर सांगतो. तो म्हणाला, ‘‘कोणताही माणूस पूर्णतः चांगला किंवा पूर्णतः वाईट नसतो. परिस्थिती आणि समाज त्याच्या विचारसरणीला आकार देतात. त्यामुळे खलनायक साकारतानाही त्यातली माणुसकी आणि ह्युमर जिवंत ठेवण्याचा मी प्रयत्न करतो.’’ मयूर साकारत असलेल्या दोन्ही भूमि कांमध्ये वडील हा समान दुवा आहे. मात्र, त्यांचे स्वभाव पूर्णतः वेगळे आहेत. म हिपत (ठरलं तर मग): चुकीच्या मार्गाने पैसा कमावणारा पण आपल्या मुलीवर जीवापाड प्रेम करणारा बाप. जगन्नाथ (सावळ्याची जणू सावली): मूल्यांवर जगणारा, संस्कारी आणि संयमी बाप. या विरोधाभासामुळे भूमिका अधिक गुंतागुंतीची होते आणि त्यासाठी देहबोली, आवाजाची ढब यावर विशेष मेहनत घ्यावी लागते, असे मयूरने नमूद केले. ‘ठरलं तर मग’ मधील ‘एकशे तेरा टक्के’ या संवादामुळे तो लोकप्रिय झालाच आहे, पण खऱ्या आयुष्यातही प्रेक्षकांकडून त्याला तितकेच प्रेम मिळत आहे. मयूरने सांगितले की, सावळ्याची जणू सावली मधील वडिलांची भूमिका पाहून अनेक रसिक प्रेक्षक त्याला मेसेज करून सांगतात की, ‘‘तुम्हाला पाहून आम्हाला आमच्या वडिलांची आठवण आली.’’ हीच माझ्या कामाची खरी पावती असल्याचे तो मानतो.





## योग्य व्यक्ती आयुष्यात असेल तर...

‘ठरलं तर मग या लोकप्रिय मालिकेतील सायली म्हणजेच अभिनेत्री जुई गडकरी सध्या तिच्या एका मुलाखतीमुळे चर्चे त आली आहे. जुईने प्रेमाची तिची अनोखी व्याख्या स्पष्ट केली असून, तिच्या मते प्रेमात सुरक्षितता सर्वात महत्त्वाची आहे. एका मुलाखतीत जुईला विचारण्यात आले की, ‘प्रेमाला जर एकाच शब्दात मांडायचं असेल तर तू काय म्हणशील?’ त्यावर उत्तर देताना जुई म्हणाली, ‘माझ्यासाठी प्रेम म्हणजे माझी सेफ प्लेस. जगात कुठेही काहीही सुरू असो, पण ज्या व्यक्तीसोबत असताना तुम्हाला सुरक्षित वाटतं, तेच खरं प्रेम आहे.’ जुईच्या मते, प्रेम ही केवळ भावना नसून ती एक सुरक्षिततेची जाणीव आहे. जुई गडकरी सध्या ‘ठरलं तर मग’ या मालिकेत सायलीची भूमिका साकारत असून अर्जुन (अमित भानुशाली) सोबतची तिची जोडी प्रेक्षकांना खूप आवडते. जुईच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. यापूर्वी तिचे नाव प्रसाद लिमयेसोबत जोडले गेले होते, मात्र जुईने नेहमीच तिच्या कामावर लक्ष केंद्रित केले आहे.

## ‘त्या काळाची भीती गेलेली नाही...’



दिग्दर्शक अनुराग कश्यप यांचा बहुप्रतिक्षित चित्रपट केनेडी येत्या २० फेब्रुवारी २०२६ रोजी झी५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात चार्ली ही रहस्यमय भूमिका साकारणारी अभिनेत्री सनी लिओनी हिने आपल्या भूमिकेबद्दल आणि चित्रपटाच्या विषयाबद्दल मनोगत व्यक्त केले. सनी लिओनीच्या मते, हा चित्रपट जरी कोव्हिड काळाच्या पार्श्वभूमीवर चित्रित झाला असला, तरी त्याचे विषय आजही तितकेच समर्पक आहेत. ती म्हणाली, ‘‘हा चित्रपट कोव्हिडच्या काळात चित्रित झाला होता, आणि मला वाटतं की त्या काळातील दहशतीचा प्रभाव अजूनही लोकांच्या मनात कायम आहे. प्रत्येकाने जो अनुभव घेतला, तो अजूनही ताजा आहे.’’ लॉकडाऊननंतरच्या मुंबईचे काळेकुट्ट वास्तव या चित्रपटात मांडण्यात आले आहे. सनीने या चित्रपटात चार्ली नावाची भूमिका साकारली आहे, जी एकाच वेळी हळवी आणि तितकीच खंबीर आहे. सनीने सांगितले की, अनुराग यांनी मला ही व्यक्तिरेखा समजावून सांगितल्यानंतर, मला माझ्या स्वतःच्या आयुष्यातील प्रवासाशी काही गोष्टी जोडता आल्या. त्यांनी मला भावनिकदृष्ट्या सुरक्षित वाटेल असे वातावरण दिले, ज्यामुळे मी स्वतःला त्यांच्या व्हिजनसमोर पूर्णपणे समर्पित करू शकले. एका निष्णात दिग्दर्शकासोबत काम करताना सनीने स्वतःला पूर्णपणे प्रक्रियेत झोकून दिले. ती म्हणाली, ‘‘मी एक उत्तम श्रोता होण्याचा प्रयत्न केला आणि जास्तीत जास्त माहिती आत्मसात केली. अनुराग कश्यप किंवा इतर महान दिग्दर्शकांसोबत काम करण्याची संधी मी कधीच हलक्यात घेतली नाही. त्यांच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवून काम करणे हा एक वेगळा अनुभव होता.’’

## ओटीटीवर ‘भक्षक २’चा थरार

गेल्या आठवड्यात नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेला ‘भक्षक २’ हा सध्या ओटीटी विश्वात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पहिल्या भागाप्रमाणेच याही चित्रपटाने प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवला असून, कथेतील वास्तववाद पाहून प्रेक्षक सुन्न झाले आहेत. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून मिळत असलेला प्रतिसाद आणि त्याचा एकूण प्रभाव सकारात्मक आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून सोशल मीडियावर ‘भक्षक २’ ट्रेंड होत आहे. प्रेक्षकांच्या मते, हा केवळ एक चित्रपट नसून समाजातील भीषण वास्तवाचे दर्शन घडवणारा आरसा आहे. मानवी तस्करी आणि सिस्टीममधील भ्रष्टाचार ज्या पद्धतीने मांडला आहे, त्यावरून ‘हा चित्रपट पाहताना अंगावर काटा येतो’, अशा प्रतिक्रिया सामान्य प्रेक्षकांनी दिल्या आहेत. या चित्रपटात भूमी पेडणेकरच्या वैशाली सिंग या भूमिकेला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले आहे. मात्र, यावेळी मराठमोळी अभिनेत्री सई ताम्हणकर हिच्या एन्ट्रीने प्रेक्षकांना सुखद धक्का दिला आहे. एका कणखर पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत सईने भूमीला दिलेली तोडीस तोड साथ प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. ‘‘दोन सशक्त अभिनेत्री जेव्हा एकत्र येतात, तेव्हा पडद्यावर जादू निर्माण होते,’’ अशा कमेंट्स पाहायला मिळत आहेत. डिजिटल प्लॅटफॉर्मवर या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगल्या रेटिंग मिळत आहे.



## गोष्ट अनोख्या ब्राउनीची

फोटो काढून घेणं अथवा काढणं हे आपलं आवडत काम! कधी काळी या कामासाठी फोटोग्राफरची मदत घ्यावी लागायची, मात्र आता आपणही अगदी सफाईनं छान छान फोटो काढू शकतो. पण मित्रांनो, तुम्हाला माहितेय मुलांसाठी बनवला गेलेला पहिला कॅमेरा कोणता? १ फेब्रुवारी १९०० या दिवशी 'ब्राऊनी' या नावानं खास कॅमेरा बनवला गेला.

या कॅमेऱ्यानं मुलांचं विश्वच बदलून टाकलं. तेव्हा अवघ्या १ डॉलर एवढ्या वाजवी किंमतीत हा कॅमेरा उपलब्ध होत असे. जॉर्ज इस्टमन या संशोधकानं जटिल स्वरूपातील तंत्रज्ञान साध्याशा मशिनमध्ये बसवलं आणि एखाद्या खेळण्यासारखा हा कॅमेरा मुलांच्या हाती आला. सुरवातीला याचं स्वरूप अगदी प्राथमिक होतं, पण नंतर नवीनवी फीचर्स जोडली गेली आणि ब्राऊनीचं स्वरूपही अद्ययावत होत गेलं. ७० वर्षाच्या काळात ब्राऊनीची तब्बल १०० नवीन मॉडेल आली. ही सगळी मॉडेल मुलांना समोर ठेऊनच बनवली गेली होती. याचं ब्राऊनी हे नावही विशेष आहे. युरोपियन कथांमध्ये ब्राऊनी नावाचं एक महत्त्वाचं पात्र आहे. हे पात्र जमिनीच्या खाली रहातं आणि रात्रीच्या वेळी जमिनीबाहेर येऊन मुलांची करमणूक करतं.

**नोंद घ्या**

हे छोट्या चणीचं काल्पनिक पात्र त्याकाळी खूपच लोकप्रिय होतं. म्हणूनच मुलांसाठी बनवल्या गेलेल्या या कॅमेऱ्याचं नाव ब्राऊनी ठेवलं गेलं होतं. या कॅमेऱ्याच्या मदतीनं मुलं घरात अथवा बाहेर कुठेही, कधीही छान छान फोटो घेऊ शकायचे. आता कॅमेऱ्याचं विश्वचं बदललंय. तुम्हीदेखील अद्ययावत कॅमेरा वापरत असाल. आई-बाबांच्या स्मार्ट फोनवर फोटो घेत असाल. डिजिटल कॅमेऱ्याचीही मदत आहेच. या बदलत्या परिस्थितीत आता ब्राऊनी मागे पडलाय. सध्या तो वस्तू संग्रहालयातच बघायला मिळेल! मात्र कधीतरी यापासूनच 'स्माईल प्लीज' ची सुरवात झाली होती हे लक्षात ठेऊ या!



## सूर्य का दिसतो तांबडा?

**नॉलेज अपडेट**



सूर्योदय आणि सूर्यास्त होत असताना सूर्य लालसर दिसतो. बाकीच्या वेळी तो पांढरट पिवळा दिसतो. सूर्य खरंच रंग बदलतो की आपल्याला सूर्याचा रंग बदलल्यासारखं वाटतं? सूर्याच्या रंगबदलामागे नेमकं काय आहे हे जाणून घेऊ या...

सूर्यापासून पृथ्वीपर्यंत येणाऱ्या प्रकाशात तीन प्रकारची किरणं असतात. अल्ट्रा व्हायोलेट म्हणजे अतिनील किरणं, उघड्या डोळ्यांना दिसणारी किरणं आणि इन्फ्रा रेड किरणं हे ते प्रकार होत. अल्ट्रा व्हायोलेट आणि इन्फ्रा रेड किरणं डोळ्यांना दिसत नाहीत. डोळ्यांना दिसणारी किरणं पांढऱ्या रंगाची असून त्यात जांभळा, पारवा, निळा, हिरवा, पिवळा, केशरी आणि लाल असे सात रंग असतात. पृथ्वीवरची धूळ, वायू आणि धुलीकणांमुळे सूर्याचा प्रकाश वेगवेगळ्या दिशांना विखुरला जातो. जांभळा रंग जास्त प्रमाणात विखुरला जातो तर लाल रंग सर्वात कमी विखुरला जातो.

सूर्योदयाच्या वेळी पृथ्वी सूर्याच्या दिशेने फिरत असते तर सूर्यास्ताच्या वेळी ती सूर्यापासून लांब जात असते. या कालावधीत सूर्यप्रकाशाला विशिष्ट कोनातून प्रवास करावा लागतो. पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी बरंच लांबचं अंतर कापावं लागतं. या प्रवासात प्रकाशाला बऱ्याच अडथळ्यांना सामना करावा लागतो. या दरम्यान प्रकाश पृथ्वीवर पोहोचायच्या आधीच हिरवा आणि जांभळा हे रंग विखुरले जातात तर लाल रंग सर्वात कमी विखुरला जात असल्याने आपण हा रंगच तेवढा पाहू शकतो. कारण हाच रंग आपल्यापर्यंत पोहोचतो.


दुपारच्या वेळी सूर्य आपल्या डोक्यावर असतो. त्यावेळी तो पांढरट दिसतो. यावेळी सूर्यप्रकाशाला पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी बरंच कमी अंतर पार करावं लागतं. त्यातच प्रकाशाला फारशा अडथळ्यांचा सामना करावा लागत नाही. त्यामुळे रंग विखुरले जाण्याचं प्रमाण बरंच कमी असतं. दिवसाच्या इतर काळात सूर्यप्रकाशाला अंतर पार करावं लागतं त्यापेक्षा बरंच जास्त म्हणजे तब्बल ५० पट जास्त अंतर सूर्योदय आणि सूर्यास्तादरम्यान पार करावं लागतं.

## माहिती ॲप लॉकर्सची

**स्मार्ट टिप्स**

सध्या पॅटर्न लॉक किंवा पासवर्डचा वापर करून फोन सुरक्षित ठेवला जातो. इतकंच नाही तर डॉक्युमेंट्स, फोटो, व्हिडिओ सुरक्षित ठेवण्यासाठी विविध ॲप लॉकर्सचा वापर केला जातो, अशाच काही ॲप लॉकर्सची माहिती...

✼ 'लिओ प्रायव्हसी गार्ड' या ॲप लॉकरच्या माध्यमातून तुम्ही




फोनमधला डाटा सुरक्षित ठेऊ शकता. हरवलेला मोबाईलही ट्रॅक करता येतो. तसंच फोन ओपन करण्यासाठी कोणी चुकीचा पासवर्ड टाकला तर हे ॲप त्याचा फोटो काढतं. हा फोटो तुमच्या फोनमध्ये सेव्ह होतो.

✼ 'सीएम सिक्युरिटी ॲप लॉक ॲंटिव्हायरस' हे ॲप फोन सुरक्षित ठेवतंच शिवाय व्हायरसपासूनही त्याचा बचाव करतं.

✼ 'ॲपलॉक फिंगरप्रिंट' तुमच्या फोनमधील ॲप्स लॉक करतं. यात फेस लॉक, टायमर लॉक, रिमोट लॉक, स्क्रीन लॉक आणि ब्लूटूथ लॉकसारखे फीचर्सही आहेत.

✼ 'हॉटस्पॉट शिल्ड प्रायव्हसी ॲप लॉक'च्या मदतीने तुम्ही सगळी ॲप्स सुरक्षित ठेऊ शकता. या ॲपमुळे फोनच्या स्क्रीनवर मजेशीर स्क्रीन सेव्हर्सही लावता येतील.

## ॲक्वा सायन्सच्या जगात...

**कोण होणार?**

पृथ्वीचा एक तृतीयांश भाग पाण्याने वेढलेला आहे. पाण्याच्या विविध स्त्रोतांमध्ये जीवसृष्टी नांदते. या जीवसृष्टीसंबंधीच्या विज्ञानाला ॲक्वा सायन्स म्हणतात. ॲक्वा सायन्समध्ये समुद्रातल्या तसंच गोड्या



पाण्यातल्या वातावरणाचा अभ्यास केला जातो. ॲक्वा सायन्सला ॲक्वाटिक सायन्स असंही म्हटलं जातं. समुद्र, नद्या, तलाव, कालवे, खाड्या, पाणथळ प्रदेश यांच्याशी संबंधित विषय ॲक्वा सायन्समध्ये शिकवले जातात. ॲक्वा सायन्समधल्या करीअरविषयी जाणून घेऊ या...

पात्रता : या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. बारावीत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भूरचनाशास्त्र हे विषय असणं गरजेचं आहे.

इतर कौशल्यं : निरीक्षणशक्ती, धैर्य, उत्तम आरोग्य, संवादकौशल्य, कॉम्प्युटरचं उत्तम ज्ञान ही कौशल्यंही गरजेची आहेत.

संधी : भारताला प्रचंड मोठी जलसंपदा लाभली आहे. त्यामुळे यासंबंधीच्या खाजगी आणि सरकारी क्षेत्रांमध्ये बऱ्याच संधी उपलब्ध झाल्या आहेत. पाण्यातल्या जीवसृष्टीचा अभ्यास करणाऱ्या विविध संस्थांमध्ये तुम्ही काम करू शकता. जलप्रदूषणावर काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. ॲक्वा सायन्सचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही चांगलं उत्पन्नही मिळवू शकता.

## रात्री वापरू नका मोबाईल

**हेल्थ वेल्थ**

आपल्याला स्मार्टफोनशिवाय चैन पडत नाही. झोपण्याआधीही आपण स्मार्टफोन वापरतो. पण अंधारात स्मार्टफोन वापरण्याचे बरेच धोके असतात. म्हणूनच झोपण्याच्या तासभर आधी मोबाईल दूर ठेवायला हवा. मोबाईलच्या प्रकाशामुळे डोळ्यांवर वाईट परिणाम होत असतो. तुम्हीही अंधारात किंवा झोपण्याआधी स्मार्टफोन वापरत असाल मग याचे धोके जाणून घ्या.

✼ अंधारात अर्धा तास स्मार्टफोन बघितला तरी डोळे कोरडे होऊ लागतात. डोळे कोरडे पडू लागल्याने आतील पडद्यावर म्हणजेच रेटिनावर वाईट परिणाम होतो. अंधारात सतत स्मार्टफोन वापरला तर दृष्टी अधू होऊ शकते.

✼ हॉर्वर्ड विद्यापीठातही संशोधन करण्यात आलं. अंधारात स्मार्टफोन वापरल्यामुळे फक्त डोळ्यांनाच त्रास होतो असं नाही तर शरीराच्या इतर अवयावांवरही त्याचा दुष्परिणाम होतो, असं संशोधनातून समोर आलं आहे.



✼ अंधारात फोन वापरल्याने शरीरात मेलाटोनिन या हार्मोनची पातळी कमी होऊ लागते. यामुळे लवकर झोप येत नाही.

✼ मेलाटोनिन हार्मोनची पातळी कमी झाल्याने ताण येतो.

✼ रात्री उशीरपर्यंत मोबाईलचा वापर केल्याने स्मरणशक्तीवर वाईट परिणाम होतो.


✼ झोपेवर परिणाम झाल्याने दिवसभर थकवा जाणवतो. उत्साह कमी होतो.

✼ अंधारात मोबाईल वापरल्याने मेंदूपर्यंत संदेश पोहोचवणाऱ्या पेशींवर वाईट परिणाम होतो. त्यांचं काम बाधीत होतं.

## मौल्यवान प्लॅटिनम

**खनिजांची माहिती**

प्लॅटिनम हा एक अतिशय मौल्यवान आणि दुर्मिळ धातू आहे. तो दिसायला चांदीसारखा पांढरट आणि चमकदार असतो. हा धातू गंजत नाही. तुटत नाही आणि खूप काळ तसाच टिकतो. म्हणून तो खूप खास मानला जातो. प्लॅटिनम पृथ्वीच्या पोटात खोलवर खडकांमध्ये सापडते. ते इतर धातूंमध्ये मिसळलेले असते. जगात प्लॅटिनमचे मोठे साठे दक्षिण आफ्रिका, रशिया, झिंबाब्वे आणि कॅनडा या देशांमध्ये आढळतात. भारतात प्लॅटिनम फारच कमी प्रमाणात मिळते. प्लॅटिनम मिळवण्यासाठी खाणीतील खडक बाहेर काढले जातात. हे खडक फोडून त्यावर विशेष रासायनिक प्रक्रिया केल्या जातात. या प्रक्रियेत प्लॅटिनम इतर धातूंमधून वेगळे केले जाते आणि शुद्ध स्वरूपात मिळवला जाते. ही प्रक्रिया कठीण आणि वेळखाऊ असते.त्यामुळे प्लॅटिनम महाग असते.



प्लॅटिनमचे अनेक उपयोग आहेत. दागिन्यांमध्ये प्लॅटिनमचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. अंगठी, हार, बांगड्या यांसाठी हा धातू खूप वापरला जातो. कारण तो चमकदार दिसतो आणि लवकर खराब होत नाही. डॉक्टरांच्या उपकरणांमध्ये आणि काही औषधांमध्येही प्लॅटिनम वापरला जातो. हा धातू शरीरासाठी सुरक्षित आहे.



गाड्यांमध्येही प्लॅटिनमचा उपयोग होतो. वाहनांच्या धुरामधील घातक वायू कमी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रांमध्ये प्लॅटिनम असते. त्यामुळे प्रदूषण कमी करण्यास मदत होते. तसेच काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्येही प्लॅटिनम वापरले जाते.

प्लॅटिनम दिसायला सुंदर आहे. परंतु ते फक्त दागिन्यांसाठीच नव्हे, तर विज्ञान आणि पर्यावरणासाठीही महत्त्वाचे आहे. कमी प्रमाणात सापडणारे, टिकाऊ आणि उपयोगी असल्यामुळे प्लॅटिनम हा खरोखरच मौल्यवान धातू मानला जातो.

## वोल्गा- रशियाची राष्ट्रीय नदी

**ओळख नद्यांची**

वोल्गा नदी ही जगातील आणि युरोपातील अतिशय महत्त्वाची नदी मानली जाते. ही नदी रशियातून वाहते आणि युरोपातील सर्वांत लांब नदी मानली जाते. वोल्गा नदीचा उगम रशियाच्या पश्चिम भागात असलेल्या वोल्गा टेकड्यांमध्ये होतो. सुरुवातीला ती लहान ओढ्यासारखी वाहते, पण पुढे अनेक नद्या मिळाल्यामुळे ती मोठी आणि शक्तिशाली नदी बनते. ही नदी दक्षिण दिशेने वाहत शेवटी कॅस्पियन समुद्रात मिळते. विशेष म्हणजे कॅस्पियन समुद्र हा जगातील सर्वांत मोठा बंद समुद्र आहे. बंद समुद्र म्हणजे जवळजवळ चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला समुद्र.

वोल्गा नदीची एकूण लांबी साधारण ३५३० किलोमीटर आहे. वाटेत ती अनेक महत्त्वाच्या शहरांतून वाहते. त्यामध्ये मॉस्कोजवळचा भाग, निज्नी नोव्हगोरोड, काझान, समारा, व्होल्गोग्राड ही शहरे येतात. त्यामुळे वोल्गा नदी रशियाच्या जीवनाशी खूप घट्ट जोडलेली आहे. रशियामध्ये तिला राष्ट्रीय नदी असेही म्हटले जाते. या नदीला वाटेत ओका, कामा यासारख्या मोठ्या नद्या मिळतात. त्यामुळे तिच्या पात्रात पाणी मुबलक असते. वोल्गा नदीवर अनेक धरणे आणि जलाशय बांधलेली आहेत. या धरणांच्या पाण्यातून वीज निर्मिती केली जाते, शेतीसाठी पाणी मिळते आणि पूर नियंत्रणात राहतो. वोल्गा नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. गहू, बार्ली, भाजीपाला अशी पिके येथे घेतली जातात.

वोल्गा नदीचा वापर वाहतुकीसाठीही मोठ्या प्रमाणावर होतो. मोठ्या होड्या, मालवाहू जहाजे या नदीतून ये-जा करतात. त्यामुळे मालाची ने-आण स्वस्त आणि सोपी होते. या नदीत अनेक प्रकारचे मासे आढळतात. काही भागात मासेमारी हा लोकांचा मुख्य व्यवसाय आहे.



इतिहासाच्या दृष्टीनेही वोल्गा नदी खूप महत्त्वाची आहे. प्राचीन काळापासून व्यापारी मार्ग या नदीवरून जात होते. अनेक संस्कृती आणि लोकांचा संपर्क या नदीमुळे झाला. आजही वोल्गा नदी रशियाच्या अर्थव्यवस्था, संस्कृती आणि दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

## भन्नाट मोबाईल स्क्रीन्स

**स्मार्ट नॉलेज**

स्मार्टफोनच्या स्क्रीनचे वेगवेगळे प्रकार बघायला मिळतात. त्यांची माहिती जाणून घेणं रंजक ठरेल.

✼ बऱ्याच फोन्समध्ये टीएफटी एलसीडी या प्रकारचा स्क्रीन वापरला जातो. या स्क्रीनवरच्या प्रतिमेचा दर्जा चांगला असला तरी उन्हात त्यावरची अक्षरं नीट दिसत नाहीत. म्हणून बजेट किंवा फीचर फोनमध्ये अशा स्क्रीन्सचा वापर केला जातो.


✼ आयपीएस एलसीडी स्क्रीनचा वापर बजेट फोनपेक्षा चांगल्या दर्जाच्या फोनमध्ये केला जातो. या स्क्रीनवाल्या फोनमध्ये बॅटरीचा वापर कमी होतो.

✼ एलसीडी टचस्क्रीनचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे रेजिस्टीव्ह टचस्क्रीन एलसीडी आणि दुसरा कॅपॅसिटिव्ह रेजिस्टीव्ह टचस्क्रीन. रेजिस्टीव्ह टचस्क्रीनवर दोन थर असतात. हात लावल्यानंतर दोन्ही थर एकमेकांशी जोडले जातात आणि स्क्रीनचं काम सुरू होतं.

✼ कॅपॅसिटिव्ह टचस्क्रीन एलसीडी स्क्रीनचा काचेचा थर पारदर्शक असतो. रेजिस्टीव्ह स्क्रीनच्या तुलनेत हा स्क्रीन लवकर प्रतिसाद देतो.

✼ ओएलईडी हा नव्या तंत्रज्ञानाने युक्त अशा स्क्रीनचा प्रकार आहे. यात काचेच्या वरच्या आणि खालच्या प्लेटदरम्यान ऑर्गेनिक पदार्थांचा थर दिलेला असतो.

✼ एएमओएलईडी हा स्क्रीनचा प्रकार खूप लोकप्रिय ठरतो आहे. हा ओएलईडीचाच एक प्रकार आहेत.




✼ सुपरएएमओएलईडी हा एएमओएलईडीचा पुढचा टप्पा आहे. यात टच सेंसर बसवलेले असतात. हा सर्वात बारीक स्क्रीन मानला जातो.

✼ ॲपलने आयफोन ४ मध्ये रेटिना डिस्प्ले स्क्रीनचा वापर केला होता. या स्क्रीनमधले पिक्सेल्स युजरच्या डोळ्यांना जाणवत नाहीत. म्हणून याला रेटिना डिस्प्ले असं म्हटलं जातं.


✼ गोरीला ग्लास स्क्रीन लवकर तुटत नाही. या काचेवर ओरखडे उठत नाहीत. त्यामुळे कंपन्या गोरिला ग्लासला प्राधान्य देतात.

## आकाशातील संदेशवाहक

**रंजक विज्ञान**


आपण मोबाईलवर बोलतो, दूरदर्शन पाहतो, इंटरनेट वापरतो, पण हे सगळे इतक्या दूरदूरपर्यंत कसे पोहोचते हे तुम्हाला माहीत आहे का? यामागे आपले उपग्रह मोठी भूमिका बजावतात. उपग्रह म्हणजे पृथ्वीभोवती फिरणारी माणसाने बनवलेली यंत्रे. ही यंत्रे आकाशात खूप उंच फिरत असतात. त्यामुळे पृथ्वीचा मोठा भाग त्यांना एकाच वेळी दिसतो.

समजा, तुम्ही एका गावातून दुसऱ्या शहरात तुमच्या मित्राला संदेश पाठवायचा आहे. तुमचा मोबाईल तो संदेश आधी जमिनीवरच्या टॉवरकडे पाठवतो. तिथून तो संदेश थेट आकाशात असलेल्या उपग्रहाकडे जातो. उपग्रह तो संदेश पटकन पकडतो आणि लगेच पृथ्वीवर दुसऱ्या ठिकाणी असलेल्या टॉवरकडे पाठवतो. त्या टॉवरमधून तो संदेश तुमच्या मित्राच्या मोबाईलपर्यंत पोहोचतो. हे सगळे इतक्या वेगाने घडते की आपल्याला क्षणभरही वाट पाहावी लागत नाही. उपग्रह संदेश पाठवतात, ते हवामानाचा अंदाज देतात, वादळ, पाऊस, चक्रीवादळ यांची माहिती आधीच सांगतात. ते पृथ्वीची छायाचित्रे काढून जंगल, शेती, नद्या आणि शहरांमधील बदल दाखवतात. जी-पीएसमुळे आपल्याला रस्ते, गावे आणि अचूक ठिकाण शोधता येते. उपग्रहांचा वापर आपत्ती व्यवस्थापनात होतो. पूर किंवा भूकंपानंतर नेमकी मदत कुठे आणि कशी पोहोचवता येईल, हे त्यामुळे कळते. काही उपग्रह अंतराळाचा अभ्यास करतात आणि पृथ्वीबाहेर काय घडते आहे याची माहिती आपल्याला देतात.




उपग्रह संदेश पाठवण्यासाठी रेडिओ लहरींचा वापर करतात. या लहरी दिसत नाहीत, पण त्या हवेतून आणि अवकाशातून फार वेगाने प्रवास करतात. उपग्रहाकडे खास अँटेना असतात. ते संदेश स्वीकारतात. थोडा मजबूत करतात आणि पुढे पाठवतात. म्हणूनच दूर असलेले देश, समुद्रात असलेली जहाजे किंवा डोंगरांमधली ठिकाणेही एकमेकांशी संपर्कात राहू शकतात.

दूरदर्शनवरील कार्यक्रम, थेट सामने, हवामानाचा अंदाज, जीपीएस - हे सगळे उपग्रहांशिवाय शक्यच झाले नसते. अंतराळात शांतपणे फिरणारे हे उपग्रह जणूआकाशातील संदेशवाहकआहेत. आपण पाठवलेला संदेश योग्य ठिकाणी पोहोचवण्याचं महत्त्वाचं काम ते दिवस-रात्र करत असतात. म्हणूनच, आपला एक छोटासा संदेश संपूर्ण जगभर पोहोचू शकतो, कारण आकाशात उपग्रह आपल्यासाठी सतत काम करत असतात.



# अलिबागमध्ये शिवचरित्राचे सजीव सादरीकरण














## निवडक

### पाकिस्तानी खेळाडूंची आर्थिक कोंडी



**नवी दिल्ली :** भारताशी पंगा घेणे पाकिस्तानी खेळाडूंना किती महागात पडू शकते, याची प्रचिती आता येताना दिसत आहे. दक्षिण आफ्रिका टी-२० व कॅरेबियन प्रीमिअर लीगमध्ये इंडियन प्रीमिअर लीग फ्रँचायझींनी पाकिस्तानी खेळाडूंकडे पाठ फिरवली असताना आता आणखी एका लीगमधून पाकड्यांना थारा दिला जाणार नाही. द हंड्रेड २०२६ लीगमधील मँचेस्टर सुपर जायंट्स, एमआय लंडन, साऊदर्न ब्रेव्ह व सनराईस लीड्स या चार संघांमध्ये आयपीएल फ्रँचायझींची गुंतवणूक आहे. या चारही संघांनी लिलावात पाकिस्तानी खेळाडूंवर बोली न लावण्याचा पवित्रा घेतला आहे. द हंड्रेड २०२६ साठी ११ मार्च ( महिला) व १२ मार्च ( पुरुष) रोजी लिलाव लंडन येथे पार पडणार आहे. या लिलावासाठी पाकिस्तानी खेळाडूंसह १८ देशांच्या १००० खेळाडूंनी नोंदणी केली आहे. पण, आयपीएल फ्रँचायझीचा मालकी हक्क असलेल्या संघांनी पाकिस्तानी खेळाडूंवर बोली न लावण्याचा निर्णय घेतला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजकीय संबंध फार चांगले नाहीत आणि त्यामुळेच आयपीएल फ्रँचायझी मालकांनी हा निर्णय घेतला आहे.

### झिम्बाब्वेने यजमान श्रीलंकेला नमवले



**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियापाठोपाठ झिम्बाब्वेने टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत श्रीलंकेचा पराभव करून धक्कादायक निकालाची मालिका सुरू केली. ब गटाच्या शेवटच्या साखळी सामन्यात झिम्बाब्वेने यजमानांना कोलंबोच्या मैदानावर सहज पराभूत केले. ही भारतासह अन्य संघांसाठी धोक्याची घंटा आहे. झिम्बाब्वेला यजमान श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १७८ धावा केल्यानंतर झिम्बाब्वेचा पराभव निश्चित मानला जात होता. पण, झिम्बाब्वेने कडवी टक्कर दिली. झिम्बाब्वेच्या फलंदाजांनीही दमदार सुरुवात केली. ब्रायन बेन्नेट व तदिवानाशे ( ३४) या जोडीने ६९ धावांची सलामी दिली. त्यानंतर रायन बर्लने १२ चेंडूंत २३ धावा कुटल्या. ब्रायनल कर्णधार सिकंदर रझाची साथ मिळाली. या दोघांनी शेवटच्या षटकापर्यंत सामना नेला. ब्रायनने अर्धशतक पूर्ण करताना १८ चेंडूंत १९ धावा अशी मॅच जवळ आणली. ब्रायन व सिकंदर यांनी ४० चेंडूंत ६९ धावांची भागीदारी केली. सिकंदर २६ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ४५ धावा कुटल्या. ६ चेंडूंत ८ धावा झिम्बाब्वेला हव्या होत्या. २०व्या षटकात पहिलाच चेंडू टॉनी मुनयोंगाने सीमापार भिरकावला. त्यानंतर पुढील दोन चेंडूंत दोन धाव घेत झिम्बाब्वेने ६ विकेट्सने हा सामना जिंकला.

### न्यूझीलंड सुपर-आठ फेरीत

**चेन्नई :** टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडने कॅनडाला धूळ चारून 'ड' गटातून आगेकूच केली. तर 'क'गटात नेपाळने आपला अखेरचा साखळी सामना जिंकताना स्कॉटलंडला नमवून स्पर्धेचा शेवट गोड केला. या स्पर्धेत 'अ' गटात भारत, पाकिस्तान, अमेरिका, नेदरलँड्स, नामिबिया यांचा समावेश आहे. 'ब'गटात ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, आयर्लंड, झिम्बाब्वे, ओमान हे संघ आहेत. 'क' गटात इंग्लंड, वेस्ट इंडिज, नेपाळ, इटली, स्कॉटलंड यांना स्थान देण्यात आले आहे, तर 'ड' गटात न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, कॅनडा, संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातून आघाडीचे दोन संघ सुपर-आठ फेरीत दाखल होतील. मग सुपर-आठ फेरीत दोन गट तयार केले जातील. या फेरीच्या अखेरीस आघाडीवर असलेले दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र होतील. ७ मार्चला अहमदाबाद येथे अंतिम सामना खेळवण्यात येईल.

# भारत महिला संघ अंतिम फेरीत

## श्रीलंका संघाचा केला पराभव

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय महिला संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे, तर महिला भारतीय 'अ' संघ हा वुमन्स आशिया रायझिंग स्टार स्पर्धा खेळत आहे. भारताच्या संघाने पहिल्या तीन सामन्यांपैकी दोन सामन्यांमध्ये विजय मिळवला होता तर सेमीफायनलमध्ये श्रीलंका अ संघाला पराभूत करुन अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला आहे.

बँकॉकमधील टेर्डथाई क्रिकेट मैदानावर झालेल्या एसीसी महिला आशिया कप रायझिंग स्टार्स २०२५-२६ च्या उपांत्य सामन्यात भारत अ संघाने श्रीलंका 'अ' संघाचा ५ विकेट्सने पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि १९.४ षटकांत ११८ धावा केल्या आणि भारतासमोर

### लक्ष्याचा सहज केला पाठलाग



सर्वाधिक ३५ चेंडूत ३१ धावा केल्या, तर शशिनी गिम्हानीने २२ धावा करत धावफलक टिकवून केला पण त्यांच्या संपूर्ण डावात मोठ्या भागीदारी रचण्यात त्यांना संघर्ष करावा लागला.

### राधाची सर्वोत्तम कामगिरी

भारतीय संघाची कर्णधार राधा यादवने गोलंदाजीत सर्वोत्तम कामगिरी केली. तिने ३.४ षटकांत फक्त १९ धावा दिल्या आणि ४ बळी घेतले. राधा यादव ही भारतीय वरिष्ठ महिला संघाचा भाग आहे. तनुजा कंवर आणि प्रेरणा रावत यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर मिनू मणी आणि साईमा ठाकोर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. भारतीय गोलंदाजांनी श्रीलंकेच्या कोणत्याही फलंदाजाला स्थिरावू दिले नाही. संचना कविंदीने त्यांच्याकडून सर्वाधिक ३१ धावा केल्या.

राधा यादव (४ बळी), प्रेमा रावत (२ बळी) आणि तनुजा कंवर (२ बळी) यांच्या नेतृत्वाखालील मजबूत गोलंदाजी आक्रमणाने नियमित यश मिळवून दिले आणि श्रीलंका 'अ' संघाला आरामदायी धावसंख्येपर्यंत रोखले. प्रत्युत्तरात, भारत 'अ' महिला संघाने लक्ष्याचा सहज पाठलाग करत फक्त १३.३ षटकांत ५ बाद ११९ धावा केल्या आणि ५ विकेट राखून विजय मिळवला. वरच्या फळीच्या फलंदाजांनी केलेल्या संयमी फलंदाजीमुळे हा पाठलाग पूर्ण झाला, ज्यामुळे भारतीय संघाला त्यांचा डाव सुंदरपणे वेगवान करता आला आणि आवश्यक धावगती नियंत्रणात ठेवता आली. मधल्या षटकांमध्ये त्यांच्या आक्रमक दृष्टिकोनामुळे त्यांना आवश्यक गतीपेक्षा जास्त धावगती टिकवून ठेवण्यास मदत झाली, ज्यामुळे सामन्याच्या उत्तरार्धात त्यांना बराच दबाव कमी झाला. भारताकडून दिनेश वृंदा यांनी ४२, राधा यादव यांनी ३१ आणि अनुष्का शर्मा यांनी २७ धावा केल्या.

# निखिलची चमकदार कामगिरी

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

अंधेरी पश्चिमच्या आझाद नगर येथील अंधेरी स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या ऑल इंडिया कराटे स्पर्धा २०२६ मध्ये कांदिवलीचा कराटेपटू निखिल खरातने रौप्य व कांस्य अशा दोन पदकांची कमाई केली. १२ ते १४ वयोगटातील सामन्यांमध्ये त्याने ही कामगिरी केली. या स्पर्धेत मुंबईतील शेकडो स्पर्धकांनी भाग घेतला होता. निखिल हा कांदिवली क्रांतीनगर झोपटपट्टीत राहणारा मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी आहे. त्याचे आई-वडील मोलमजुरी करून कुटुंबाचे उदरनिर्वाह करतात. तो मालाड येथील सेंट फ्रान्सिस शाळेत इयत्ता सहावीत शिकत असून, त्याला लहानपणापासूनच कराटेची आवड आहे. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून तो कराटे खेळत असून, कराटेमध्ये महत्त्वाचे असणारे सर्व बेल्ट त्याने प्राप्त केले आहेत.

# नागशेत कबड्डी स्पर्धेत रासळ विजयी




**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

ग्रामस्थ मंडळ नागशेत व श्री भैरवनाथ क्रीडा मंडळ ठाणे, मुंबई उपनगर यांच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे भव्य दिव्य आयोजन गुरुवारी (दि.१९) रोजी नागशेत येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत १६ संघानी प्रवेश नोंदविला होता. स्पर्धेतील अंतिम लढत रासळ विरुद्ध नेणवली या संघात झाली. स्पर्धेच्या अंतिम लढतीत रासळ हा संघ विजयी झाला. या संघास रोख रक्कम १५ हजार व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांक नेणवली या संघास ११ हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक चिवे, चतुर्थ क्रमांक नांदगाव या संघांना प्रत्येकी ७ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील शिस्तबद्ध संघ करजाई हा ठरला. सर्वोत्कृष्ट खेळाडू पार्थ शिर्के, सर्वोत्कृष्ट चढाई अमर ठाकूर, उत्कृष्ट पक्कड रोहित शेडगे, पब्लिक हिरो राकेश खैरे या सर्व खेळाडूंना मंडळाच्या वतीने आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

# एमसीएच्या क्रिकेट सामन्यांना सुरुवात

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ गटातील पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेतील ग्रुप 'डी' मधील सामन्यांना रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर सुरवात करण्यात आली. ग्रुप 'डी'मध्ये सहा संघ सहभागी झाले असून त्यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघा सह नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन, क्लब ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे, वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे, सेंट्रल झोन असे संघ सहभागी झाले आहेत. जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान गव्हाण उलवे, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी पाताळगंगा मैदान, रिलायन्स क्रिकेट



ग्राऊड नागोठण मैदानांवर स्पर्धेतील सामन्यांची उत्साहात सुरवात झाली असून पहिल्या साखळी फेरीच्या दोन दिवसीय सामन्यात, क्लब ऑफ महाराष्ट्र, वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे व नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघानी विजय मिळवला आहे.रिलायन्स नागोठणे येथील मैदानावर झालेल्या रायगड विरुद्ध नाशिक संघांमधील सामन्यात रायगडच्या संघानी संथ गतीने गोलंदाजी केली परिणामी रायगडच्या संघाला २८ धावांची पॅन्टल्टी लागली असून सामना अनिर्णित राहिला असला तरी पहिल्या डावाच्या आधारे सामना नाशिकच्या संघाने जिंकला. नाशिकच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १६८ धावा अधिक २८ धावा ह्या संथ गतीने गोलंदाजी केली म्हणून पेनल्टी लागली व एकूण १९६ धावा नाशिकच्या संघाने काढल्या तर प्रतिउत्तर देताना रायगडच्या संघाने सर्व गडी गमावत १९० धावा केल्या.

दुसऱ्या डावात नाशिकच्या संघाने सर्व गडी बाद २२७ धावा काढल्या तर रायगडच्या संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ८ गडी बाद १५० धावा फलकावर नोंदवल्या होत्या.पहिल्या डावात पेनल्टी लागल्यामुळे रायगडच्या संघाला सामना पहिल्या डावाच्या पिछाडीमुळे गमवावा लागला आहे. दुसऱ्या सामन्यात क्लब ऑफ महाराष्ट्रच्या संघानी सेंट्रल झोन विरुद्ध खेळताना एक डाव व ६३ धावांनी जिंकला तर वायएमसीए क्लब पुणे संघानी सेंट्रल डिफेन्स अकॅडमी संघावर ७८ धावांनी विजय मिळवला आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्या सह सर्व पदाधिकारी व सदस्य सामने यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी उपस्थित राहून परिश्रम घेत आहेत.


## महाराष्ट्रातील जलतरणपटू सज्ज | गेटवे ऑफ इंडिया परिसरात रंगणार स्पर्धा

# मुंबईत होणार 'संक रॉक'चा जल्लोष

मुंबई, प्रतिनिधी

अथांग अरबी समुद्राच्या निळ्याशार लाटांवर जलतरणपटूंच्या जिद्दीचा आणि साहसाचा थरार अनुभवण्याची वेळ आली असून, प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक ङ्गद२ वी संक रॉक ओशन स्विमॅथॉन २०२६फ रविवारी (दि.२२) फेब्रुवारी रोजी दिमाखात पार पडणार आहे. मुंबईच्या ऐतिहासिक गेटवे ऑफ इंडिया परिसरात रंगणाऱ्या या महास्पर्धेचे उद्‌घाटन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते होणार आहे.

'महाराष्ट्र स्टेट अमेच्युअर क्वेटिक असोसिएशन' यांच्या वतीने हि स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक स्पर्धेचे नियोजन



### जलतरणपटूंना मोठी संधी

महाराष्ट्राच्या जलतरण कौशल्याचे प्रदर्शन होणार असल्यामुळे या ऐतिहासिक स्पर्धेत महाराष्ट्रातील जलतरणपटूंना समुद्रात आपले कौशल्य सिद्ध करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. सरचिटणीस राजेंद्र पालकर यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, या भव्य स्पर्धेला उपस्थित राहून जलतरणपटूंचा उत्साह वाढवावा आणि त्यांच्या धाडसी प्रयत्नांना पाठिंबा द्यावा.

असोसिएशनचे अध्यक्ष आनंद माने आणि सरचिटणीस राजेंद्र पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोरपणे करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी खेळाडूंनी रविवारी सकाळी ७:३० वाजता रिपोर्टिंग करणे आवश्यक असून, प्रत्यक्ष शर्यतीची सुरुवात साधारणपणे १०:३० ते ११:३० या वेळेत होणार आहे. सर्व सहभागी खेळाडूंना सकाळी ९:०० वाजता बोटीने प्रस्थान करणे अनिवार्य आहे. १ किमी अंतराची शर्यत ८-९ वर्षे वयोगटातील बालजलतरणपटू आणि दिव्यांग खेळाडूंसाठी (खुला वयोगट) राखीव आहे. २ किमी अंतराची शर्यत १०-११ वर्षे, १२-१३ वर्षे आणि ४६-५५ वर्षे वयोगटातील खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आली आहे. तर सर्वात आव्हानात्मक ५ किमी अंतराच्या शर्यतीत १४-१५ वर्षे, १६-२५ वर्षे आणि २६-४५ वर्षे वयोगटातील पुरुष व महिला जलतरणपटू समुद्राच्या लाटांशी दोन हात करताना दिसतील.

स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्यांना रोख पारितोषिके, गुणवत्ता ई-प्रमाणपत्र, आकर्षक भेटवस्तू आणि पहिल्या तीन क्रमांकांसाठी पदके देऊन गौरविण्यात येणार आहे. १ किमी, २ किमी आणि ५ किमी अंतरातील सर्वात वेगवान पुरुष आणि महिला जलतरणपटूंना प्रतिष्ठेची 'फास्टेस्ट स्विमर ट्रॉफी' आणि 'रोलिंग ट्रॉफी' प्रदान करून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान केला जाणार आहे. ही ट्रॉफी जिंकणे म्हणजे जलतरणपटूंसाठी सर्वोच्च गौरव मानला जातो. स्पर्धेदरम्यान सहभागी सर्व जलतरणपटूंच्या सुरक्षिततेसाठी विशेष वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. समुद्रातील आव्हानात्मक परिस्थिती लक्षात घेता आयोजकांनी अत्यंत काटेकोरपणे नियोजन केले आहे, ज्यामुळे खेळाडूंना सुरक्षित आणि आत्मविश्वासपूर्ण वातावरणात स्पर्धा करता येईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)